बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | शुकवार,दि.२३ऑगस्ट २०२४ |वर्ष४२ |अंक२२वा |पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## बीड सीओंच्या दालनात कचरा टाकणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

नगरपरिषद बीड मुख्याधिकारी यांच्या कुचकामी धोरणामुळे बीड शहरांमध्ये घाणीचे साम्राज्य पसरत असून साथ रोग मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील कचरा हा घंटागाडी येत नसल्यामुळे नागरिक रस्त्यावर मोकळ्या जागेत घरातील कचरा आणून टाकत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर हा कचरा सडत आहे यामुळे शहरात देखील साथीचे रोग पसरत असून लहान मुलं वयोवृद्ध नागरिक हे आजारी पडत आहेत याकडे जाणीवपूर्वक नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी हे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते ड.सदानंद वाघमारे यांनी केला आहे.दोन दिवसात बीड शहरात घंटागाडी चालू न केल्यास त्यांच्या केबिनमध्ये बीड शहरातील घराघरातील कचरा आणून टाकणार असल्याचेही सदानंद वाघमारे यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात कळवले आहे.

## परवानगिचे पत्र देवूनही गुन्हे दाखल

प्रशांत वासनिक : बीड
पोलिसांची भूमिका संशयास्पद



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

दलित आदिवासी आरक्षणातील वर्गीकरणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकाला विरोधात बुधवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी भारत बंदची सर्वपक्षीय हाक देण्यात आली होती. त्या अनुषंगाने बीडमध्ये देखील बंद पुकारण्यात आला होता या आंदोलनासाठी बहुजन समाज पार्टीने बीडचे मा. जिल्हाधिकारी यांना आंदोलन करणार असल्याचे निवेदन दिले होते मात्र असे असताना देखील बीड पोलीस प्रशासनाने आंदोलनाची परवानगी नसल्याचे कारण सांगून आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांची हे मनमानी असून आंदोलन दाबण्याचे षडयंत्र आहे.

सदरील खोटे गुन्हे मागे घेण्यात यावेत अन्यथा आंदोलन करते बीड पोलीस प्रशासनाच्या विरोधात मा. न्यायालयात दाद मागणार आहोत. असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात बसपाचे माजी प्रदेश पान २ वर...

# बदलापूर घटनेनंतर सरकारला आली जाग!

## निर्णय : शाळांना सीसीटीव्हीसह कर्मचारी चारित्र्य पडताळणी बंधनकारक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर येथील पाशवी घटनेनंतर राज्याचा शालेय शिक्षण विभाग ताळ्यावर आला आहे. आता शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना लागू केल्या आहेत. यात प्रामुख्याने शाळा व परिसरात सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे.शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने काही अनुचित घटना घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.शालेय विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजनासंदर्भात शासनस्तरावरून वेळोवेळी आदेश काढण्यात आले होते. विद्यार्थ्यांची सुरक्षा सर्वतोपरी असल्याने, या उपाययोजनांशी तडजोड करता येणार नाही. या बाबतचे आदेश अवर सचिव प्रमोद पाटील यांनी जारी केले आहेत.

सर्व खासगी शाळांनी एका महिन्यात शाळा व परिसरातील मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पायाभूत सुविधांचे निर्माण या घटकांतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी पाच टक्के प्रमाणात राखीव ठेवण्यात आलेल्या निधीचा वापर करता येणार आहे. शाळा परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज ठराविक अंतराने तपासणे आवश्यक असून अशा फुटेजमध्ये आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्यावर योग्य कार्यवाही करण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापकांची आणि सर्वसाधारणपणे शाळा व्यवस्थापन समितीची असेल.अन्यथा संबंधित शाळांचे अनुदान रोखणे अथवा शाळेची मान्यता रद्द करण्याच्या कारवाईचा अवलंब करण्यात येणार आहे. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांनी प्राधान्याने कॅमेरे बसविण्याबाबत कार्यवाही करावी.



### पारदर्शकता आणि नियोजनाची गरज:मनोज जाधव



शासनाने काढलेल्या निर्णयाचे स्वागत आहे. परंतु सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवणे आणि मुलांच्या सुरक्षेतेच्या दृष्टीने उपाय योजना करणे हे किचकट प्रक्रिया आहे. यात पारदर्शकता आणि नियोजनाची गरज आहे. अनेक शाळांमध्ये विज जोडणी चा अभाव आहे. अशात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्याचा उपयोग होणार नाही. याकरिता देखील उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी, शाळेमधील तक्रार पेटी व इतर बाबींचा फक्त दिखावा न करता प्रत्यक्षात यावर काम होणे गरजेचे आहे.तसेच शासन निर्णयाची शिक्षण विभागाने काटेकोर अंमलबजावणी करावी. असे मत शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी व्यक्त केले आहे.

### घटना दडविल्यास कारवाई

शाळेमध्ये विद्यार्थ्यांसोबत अनुचित प्रकार घडल्याचे उघड झाल्यानंतर संबंधित शाळा व्यवस्थापन, संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सदर बाब चोवीस तासाच्या आत संबंधित शिक्षणाधिकारी यांना कळवावी. अशी अनुचित घटना कोणत्याही प्रकारे दडवून ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचे निर्दशनास आल्यास, संबंधित व्यक्ती, मुख्याध्यापक, संस्था यांच्यावर कारवाई होणार आहे.

शाळांमध्ये तक्रार पेटी बसविण्याचे बंधन, सखी सावित्री समिती स्थापण होणार,कर्तव्यात कसूर केल्यास मुख्याध्यापकावर शिस्तभंगाची कारवाई,महिला कर्मचारी यांच्या नियुक्तीला प्राधान्य,सीसीटीव्ही फुटेज आठवड्यातून तीन वेळा तपासावे लागेल.

### शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीपूर्वी चारित्र्य पडताळणी

शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना काळजी घ्यावी लागणार असून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.सुरक्षारक्षक, सफाईगार, मदतनीस, स्कूल बसचे चालक आदी बाबतीत संबंधित व्यक्तीच्या पार्श्वभूमीची काटेकोर तपासणी शाळा व्यवस्थापनामार्फत होणे आवश्यक आहे.यासाठी नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. नेमणुकीनंतर संबंधित व्यक्तीच्या छायाचित्रासह त्याची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक पोलीस यंत्रणेकडे द्यावी लागणार आहे.

## जीवन गौरव पुरस्काराने झाला सन्मान!

अभिनंदनिय : रानबा गायकवाडांना वामनदादा कर्डक पुरस्कार



परभणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

जेष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड यांना पत्रकारितेच्या आणि साहित्याच्या माध्यमातून आंबेडकरी विचारधारा जनमाणसात रुजविण्याचे कार्य केल्याबद्दल महाकवी वामनदादा कर्डक जीवन गौरव पुरस्काराने आज दिनांक २१ ऑगस्ट रोजी परभणी येथे झालेल्या एका भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. परभणी येथील बी. रघुनाथ सभागृहात महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त अभिरा फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध उद्योजक मिलिंद सावंत हे होते .तर कार्यक्रमाचे उद्घाटन संजीवनी मित्र मंडळाचे अध्यक्ष आनंद भरोसे यांच्या हस्ते झाले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विचारवंत प्रा.डॉ. भीमराव खाडे, प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते राजेश देशमुख,हभप प्रकाश महाराज साखरे,समाजभूषण संजय भाऊ कांबळे, कॉम्रेड किर्तीकुमार बुरांडे,डॉ धुतमल,यशवंत मकरंद,डॉ. सुनील तुरुकमाने,पंकज खेडकर, रामदास दळवे, विठ्ठलराव पारधे,किरण मानवतकर,प्रमोद साळवे,करण गायकवाड आदी मान्यवरांची उपस्थिती होती. अभिरा फाउंडेशनचे प्रमुख भन्ते मुदितानंद महाथेरो यांच्या संकल्पनेतून हा पुरस्कार सोहळा मागील सोळा वर्षांपासून सुरु आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घराघरात पोहोचविण्याचे महान कार्य करणारे लोककवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीच्या निमित्ताने प्रतीवर्षी अभिरा फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार आंबेडकर चळवळीतील व सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तीचा जीवनगौरव पान २ वर...

## कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांच्या फायद्याचे ठरले

नियोजन : कृषिमंत्री धनंजय मुंडेंकडून पाहणी

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात प्रथमच परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सव अंतर्गत भरवण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उद्घाटन समारंभ संपल्यानंतर भेट देऊन पाहणी केली.

कृषी क्षेत्रात लागलेले नवनवीन शोध, नवनवीन तंत्रज्ञान, नवीन आधुनिक अवजारे यांसह विविध शेती उत्पादने आदींची शेकडो दालने (स्टॉल्स) उभारण्यात आली असून नॅनो खतांची ड्रोन द्वारे फवारणी करण्याची प्रात्यक्षिके सुद्धा येथे दाखवण्यात येत आहेत. या स्टॉल्सला भेटी देण्यामध्ये कृषिमंत्री धनंजय मुंडे हे तब्बल साडेतीन



तास रमले होते. जवळपास ७.३० ते ११ वाजेपर्यंत या वेळेत त्यांनी जवळपास ३३५ स्टॉल्सला भेटी देऊन पाहणी केली व त्यांच्याकडील उत्पादनांची पान २ वर...

## पोलिसांनो फटाके फोडणाऱ्या बुलेटकडे बघा!

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

वर्दळीच्या रस्त्यावरून फट् फट् करत जाणारी बुलेट सर्वांच्याच नजरेत येते. बुलेटचे असंख्य चाहते आहेत. त्यामूळेच बुलेट लाखांच्या घरात पोहोचली असली तरीही त्याचा चाहता वर्ग असंख्य आहे. त्यामुळे बुलेट घ्यायची आणि उगीचच रूबाबात बुलेट सुस्साट पळवायची, हे आजच्या तरूणांची क्रेझ आहे. पण हीच क्रेझ तुम्हाला दुसऱ्याची डोकेदुखी झाली असल्याचे चित्र सध्या गेवराई शहरात पाहायला मिळत आहे. तुमच्या आवडत्या बुलेटच्या बदललेल्या सायलेन्सरमधून



फटाक्यांचा आवाज काढून तुम्हालाही मजा येत असेल. परंतु या फटाक्याच्या आवाजामुळे अनेक जणांना त्रास होत असून अचानक वाजणार आहे या बुलेटच्या सायलेन्सर मधील फटाक्यामुळे अनेक जणांना डचकल्यासारखे छातीत धडधड झाल्यासारखे होते. मजा एकाची पण त्रास अनेक जणांना असा प्रकार सध्या गेवराई शहरात होत आहे. महिला मुली दिसल्या की बुलेटच्या सायलेन्सर मधून फटाके फोडायचे असेही बहाद्दर गेवराई मध्ये सध्या आहे परंतु या गैर प्रकाराकडे गेवराई पोलिसांचे लक्ष नाही. गेवराईच्या नागरिकांमधून गेवराई पोलिसांनी याबाबत कारवाई करून संबंधित सायलेन्सर जप्त करावेत व त्या वाहनधारकाला दंड करावा जेणेकरून महिला व नागरिकांना होणारा त्रास बंद होईल. परंतु गेवराई पोलीस याबाबत कधी कारवाई करतात याकडे नागरिकांचे लक्ष पान २ वर...

## बीडमधून दलाल, भडवे हाकलून दिले!!

जागे व्हा : संविधान जागर यात्रेच्या आडून मोठे षडयंत्र



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या राज्यात संविधान जागर यात्रा सुरु आहे. त्या अनुषंगाने बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे, जागर संविधान यात्रेची सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेत जाणिवपूर्वक काही गोष्टी पेरल्या जात आहेत. खरंतर एकीकडे दलित,आदिवासींचे आरक्षण धोक्यात असतांना, जागर संविधान यात्रेच्या आडून मोठे षडयंत्र रचले जात आहे. त्याला समाजातले काही बेईमान लोक सहकार्य करत आहेत. त्यामुळे त्या बेईमान दलाल,भडव्या लोकांना आंबेडकरी जनतेने हाकलून दिले आहे. संपूर्ण राज्यात संविधान जागर यात्रा जात असून त्या आडून समाजात पेरले जाणारे विष ओळखून हा डाव वेळीच हाणून पडावा, असे आवाहन आंबेडकरी जनतेने केले आहे. दरम्यान कमळाबाईंकडून षडयंत्र आखले गेले पान २ वर...

### असे आहेत यात्रेतील निमंत्रक

या संविधान जागर यात्रेचे निमंत्रक म्हणून भाजपचे वाल्मिक निकाळजे, राजेंद्र गायकवाड, राजकुमार बडोले,नितीन मोरे, मिलिंद इनामदार, काश्यप साळुंखे, धम्मपाल मेश्राम, स्नेहा भालेराव, संजय कांबळे, क्षितिज गायकवाड, राजू माने, विजय गव्हाळे, मिलिंद नाखले, विजय मोरे, आकाश अंभोरे आदींचा समावेश आहे.

**नेमकं काय** | भितीने नागरिकांच्या उडाल्या झोपा

# कमालय, ड्रोन फिरताहेत पोलिसांना पत्ता नाही?

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सध्या रात्री अप रात्री खेडेगावांमध्ये ड्रोन कॅमेरा चा वावर वाढलेला आहे रोज एका गावामध्ये ड्रोन कॅमेरा फिरवण्यात येत आहे नेमका हा प्रकार काय आहे? याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागलेले आहे काही गावांमध्ये ड्रोन कॅमेरा फिरवल्यानंतर गावात काही लोक जागृत आहेत का याची दक्षता घेतली जात आहे व नंतर काही चोर गावांमध्ये शिरून गाव चोरी केली जात आहे असे खेडेगावांमध्ये चर्चा चालू आहे नेमका हा ड्रोन कॅमेरा चा प्रकार काय आहे. याकडे पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे रोज एका गावामध्ये ड्रोन कॅमेरा फिरत आहे गावागावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे याकडे गावातील सर्वसामान्य



नागरिकांनी भयभीत झालेला आहे.

मागील काही दिवसांमध्ये गेवराई तालुक्यातील व अंबड तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावरील कित्येक गावांमध्ये मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी अज्ञात दोन गिरट्या घालत आहेत सुरुवातीला ग्रामीण भागात गिरट्या घालणारे ड्रोन चार-पाच दिवसापासून मोठमोठ्या शहरात देखील ग्रीट्या घालताना दिसू लागले काही पान २ वर...

### खेडेगावात ड्रोनचा वावर वाढला

बीड जिल्ह्यात व जिल्ह्यातील धारूर वडवणी तालुक्यातील गावांमध्ये रात्री अप रात्री ड्रोन कॅमेरा चा वावर होत असल्याने सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण झाले आहे. काही अनेक गावांमध्ये रात्री उशिरापर्यंत चोरी करण्याच्या दृष्टीने रेकी करण्यासाठी ड्रोन उडवले जात असल्याची चर्चा होत आहे.मात्र रात्रीच्या वेळी आकाशात गिरट्या घालणाऱ्या ड्रोन चा उलगडापोलीस प्रशासनाने उघड करावा.

## बीडमध्ये बँक्स् असोसिएशनचा महोत्सव

पत्रकार परिषद: सत्यनारायण लोहिया यांची माहिती

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

नागरी सहकारी बँकेचा विकास साधण्यासाठी बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि. बीडची स्थापना झाली, त्यास २५ वर्ष पूर्ण झाले आहेत, त्या प्रित्यर्थ शनिवार २४ ऑगस्ट रोजी 'रौप्य महोत्सव समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत माँ वैष्णव पॅलेस एमआयडीसी बीड येथे साजरा होत आहे.बीड शहरातील शिवाजी नगर येथील छत्रपती शाहू बँक शिवाजीनगर शाखा अर्जुन भवन येथे गुरुवारी दि.२२ रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली. बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया यांनी



माहिती दिली. यावेळी छत्रपती शाहू बँकचे अध्यक्ष अजय जाहेर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. ई. पवार उपस्थित होते.

बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया म्हणाले, सुशासन आणि अनुपालन ,नागरी सहकारी बँके पुढील आव्हाने, गव्हर्नर आरबीआय यांनी नागरी सहकारी बँक संदर्भात सांगितलेल्या मुद्द्याबाबत मार्गदर्शन. संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्तरदायित्व व कर्तव्य या आणि अशा विविध विषयावर मार्गदर्शन या रौप्य महोत्सव समारंभाच्या निमित्ताने पान २ वर...

## पिंजऱ्यातले पिंजऱ्यात

अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास आदी मान्यवर गेले काही महिने एकच एक मुद्दा सातत्याने मांडताना दिसतात. तो म्हणजे बँकांतील घसरत्या ठेवींचा. आपल्याकडे बँकांत ठेवी ठेवणाऱ्यांचे प्रमाण सातत्याने घसरू लागले असून आहेत त्या ठेवींदारांतील निम्मे ठेवीदार हे वृद्ध गटातील आहेत. याचा अर्थ असा की कमावत्या वयातील तरुणांना आपल्या बँकांतील ठेवी तितक्या आकर्षक वाटेनाशा झाल्या आहेत. तरुण वयातील आकर्षणे वेगळी. ती बदलण्याचा वेगही वेगळा. ते योग्यच. कारण तरुणही वृद्धांप्रमाणेच वर्तन करू लागले तर 'जीर्ण शाल मग उरे शेवटी' हे 'लेणे तारुण्याचे' व्हायचे. मग सगळीच पंचाईत. तेव्हा तरुणांना बँकांतील ठेवी आकर्षक वाटत नसतील तर त्यांची निरिच्छा काही प्रमाणात निश्चित समजून घेता येईल. तथापि बँकांकडे पाठ फिरवण्याची तरुणांची वाढती सवय आणि त्याचवेळी बँकांकडून उचल/कर्ज घेण्याचे वाढते प्रमाण यामुळे एक विचित्र पेच भारतीय बँकांसमोर उभा ठाकलेला दिसतो. बँकांत पैसा येण्याचे घटते प्रमाण आणि त्याचवेळी कर्ज मागण्यास येणाऱ्यांचा वेग कायम असणे यातून पैशाचे बँकांतील आवक आणि जावक यातील संतुलन बिघडू लागले आहे. ही चिंतेची बाब. कारण बँकांत पैसा येणेच कमी झाले की बँका पैसा देणार कोठून? कोणीतरी ठेवी ठेवते म्हणून कोणाला तरी बँकांतून कर्ज मिळते. यात दोन-तीन टक्क्यांचा फरक असणे नैसर्गिक. पण सद्या:स्थितीत तो सहा टक्क्यांवर गेला असून त्यामुळे अर्थमंत्रालय आणि रिझर्व्ह बँक यांच्यात धोक्याची घंटा घणघणू लागली आहे. या धोक्याचे इशारे अर्थमंत्री आणि गव्हर्नर गेले काही महिने देत होते. अखेर या मुद्द्यावर अर्थमंत्र्यांनी सर्व बँक प्रमुखांशी सोमवारी चर्चा केली. आता या ठेवी कशा वाढवता येतील यासाठी प्रयत्न सुरू होतील. तेव्हा जनसामान्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला हा विषय लक्षात घ्यायला हवा. गेल्या, म्हणजे जुलै २०२४, महिन्याच्या अखेरीस आपल्या समस्त बँकांतील ठेवी २११.९३ ट्रिलियन रु. (२११.९३ लाख कोटी रु. ) इतक्या आहेत तर दिल्या गेलेल्या कर्जांची रक्कम आहे १६८.१४ लाख कोटी रु. इतकी. यावरून अजूनही पन्नासएक लाख कोटी रुपयांची कर्जे देता येतील इतकी बक्कळ रक्कम बँकांत पडून आहे, असे म्हणता येईल. म्हणजे लगेच खणखणाटास सामारे जावे लागेल, असे नाही. तथापि समस्या वर्तमानाची नाही. ती भविष्याची आहे. याचे कारण गेल्या वर्षभरात ठेवींचा दर हा कर्जाच्या दराच्या तुलनेत मागे मागे पडू लागला आहे. या वर्षात ठेवी वाढीचा वेग १०.६ टक्के इतका होता. तर कर्जे वाढीचा वेग आधी १३.७ टक्के आणि नंतर १६ टक्क्यांवर गेला. व्यक्तीस ज्याप्रमाणे उत्पन्नाच्या तुलनेत खर्च करणे वा हातउसन्या रकमा देणे अवघड असते त्याचप्रमाणे बँकांसाठीही हे संतुलन सांभाळणे आव्हान असते. त्यास 'कर्ज-पत गुणोत्तर' (क्रेडिट-डिपॉझिट रेश्यो) असे म्हणतात. बँका उगाच सढळ हस्ते कर्जे वाटत सुटू नये म्हणून त्यांना मिळणाऱ्या ठेवींतील विशिष्ट रक्कम सरकार दरबारी सुरक्षित ठेवीसाठी काढून द्यावी लागते. म्हणजे प्रत्येक १०० रुपयांच्या ठेवीतील ४.५ रु. रिझर्व्ह बँकेत रोख आणि १८ रु. सरकारी रोखे यात गुंतवणे बँकांवर बंधनकारक आहे. म्हणजेच प्रत्येक १०० रुपयांतील जेमतेम ७८.५ इतकीच रक्कम प्रत्यक्ष कर्जापोटी देण्यासाठी बँकांहाती राहते. तेव्हा बँकांतील ठेवींच्या घटत्या प्रमाणाची सरकारला इतकी चिंता का याचे उत्तर यावरून मिळेल. आता याबाबतच्या कारणांविषयी. यातील कळीचा प्रश्न म्हणजे बँकांतील ठेवींचे प्रमाण घसरण्याचे कारण काय?व्याजाचे दर हे यातील एक. सध्या बँकांतील निधींवर मिळणारा परतावा हा चलनवाढीशी जेमतेम बरोबरी साधू शकेल - न शकेल, इतका नगण्य आहे. बचत खात्यातील रकमेची तीन-साडेतीन टक्क्यांवर बोळवण होते तर ठेवींवर दोन-तीन टक्के अधिक मिळतात. भरगच्च रक्कम आणि दीर्घ कालावधी आणि परत ज्येष्ठ नागरिक असले तर एखाद्या अधिक टक्क्याची खिरापत. असे असताना ज्याची नजर भविष्याकडे आहे अशी कोणती शहाणी व्यक्ती बँकांच्या नादी लागेल? त्याचवेळी 'सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लान' (एसआयपी) सारख्या माध्यमातून अधिक किमान रकमांच्या आधारे चमचमीत परतावा देणाऱ्या अनेक गुंतवणूक योजना अनेक वित्तसंस्था घेऊन येत असतील तर अधिकाधिकांचे दिल कोणाकडे खेचले जाईल, हे सांगण्यास अर्थतज्ज्ञाची गरज नाही. बरे, या नव्या नटव्या योजनांस नावे ठेवण्याचीही सोय नाही. कारण त्यांच्या आधारे आपल्या गुंतवणुकीवर २०-२५ टक्के परतावा मिळवणाऱ्या इतक्या यशोगाथा इतक्या मध्यमवर्गीय कुटुंबांत अलीकडे वाढू लागलेल्या आहेत की त्यांच्या समोर बँकांच्या ठेवींचा आसरा शोधणारे 'नामर्द' ठरावेत. या अशाच 'एसआयपी' योजना भांडवली बाजाराबाबतही सुरू झालेल्या आहेत. आपणास जमेल तितक्या रकमेच्या आधारे सुरुवात करायची आणि आपली गुंतवणूक-वेल बहरताना पाहायची! हे हल्ली अनेक जण करतात. परत बँकांच्या तुलनेत भांडवली बाजाराच्या वेली वाढत्या ठेवण्यात सरकारलाही रस असल्याने बाजार उठणार नाही याची काळजी अगदी सर्वोच्च पातळीवर घेतली जाते.

त्यात जर नफाही आटू लागला असेल तर पुराचे पाणी धोक्याच्या इशाऱ्यास स्पर्श करू लागल्याचे मानणे इष्ट. तेव्हा अर्थमंत्र्यांची या विषयावरील वाढती लगबग रास्त ठरते. ती फलदायी ठरणे महत्त्वाचे. बँकेत रोख हाताळणारे कर्मचारी मोठ्या टेचात पिंजऱ्यात बसून जणू आपल्या खिशातलीच रक्कम समोरच्या ग्राहकास देत असल्यासारखे वागत असतात. आता समस्त बँकांवरच पिंजऱ्यात जाण्याची वेळ आली आहे. या पिंजऱ्यातून ते कशी सुटका करून घेतात ते पाहायचे.

# कथेच्या सांगतेस जनसागर लोटला!

## अण्णा महाराज दुटाळ : रेणुकामाता संस्थानमध्ये भक्तीमेळा

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिव महापुराण कथाचे आयोजन दि.१२ ऑगस्ट २०२४ सोमवार रोजीपासून करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सांगता दि.१८ ऑगस्ट २०२४ रविवार रोजी झाली. या शिव महापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस रेणुकामाता संस्थानाचा परिसर गर्दीने तुडुंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिव महापुराण कथाचे आयोजन येत्या दि.१२ ऑगस्ट २०२४ सोमवार रोजीपासून दैनंदिन सकाळी ११ ते २ या वेळेत करण्यात आले होते. महाराष्ट्रातील नामांकित शिव महापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.शालीग्राम



महाराज मते लोणीकर यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिव महापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबली आहे. याप्रसंगी सिंथ वादक ह.भ.प.माऊली महाराज घुमरे, तर तबला वादक ह.भ.प.सखाराम महाराज उंबरे यांचीही त्यांना चांगली साथ मिळाली. दरम्यान शिव महापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिले आहे. यात प्रामुख्याने धन संग्रह, रागाचा त्याग, अन्नाचा त्याग, संध्याकाळ, खरं बोलणे, निष्काम कर्म, अनावश्यक इच्छांचा त्याग करणं, मोहाचा त्याग करणं, सकारात्मक कल्पनाशक्ती, प्राणी नव्हे तर माणूस बना यांविषयी सविस्तर असे वर्णन ह.भ.प.शालीग्राम महाराज मते लोणीकर यांनी या संपूर्ण शिव महापुराण कथेत केले. यावेळी याच्या सांगते प्रसंगी बोलतांना श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रमुख अण्णा महाराज दुटाळ हे अतिशय भावूक झाले होते. ते म्हणाले की, या शिव महापुराण कथेच्या समारोपाच्या क्षणाला आज आपण आलो आहोत. याचे एका डोळ्यात आनंद आहे तर दुसऱ्या डोळ्यात दुःख आहे. की उद्यापासून या कथेचे श्रवण आपणांस होणार नाही. या कल्पनेनेच संपूर्ण उर भरुन आले आहे. भगवान शिव महादेवाची सेवा, कृपा, लिला, आशिर्वाद काय आहे हे यातून अगदी जवळून अनुभवता आले. अगदी सुरुवातीपासून ते सांगतेपर्यंत आपण सर्वांनी दिलेला भरभरुन प्रतिसाद मनाला समाधान देणार आहे. हा प्रतिसाद पाहूनच आम्हाला एक नवी ऊर्जा मिळाली असून या अनुषंगाने प्रत्येक वर्षी श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी आपण याठिकाणी या शिव महापुरान कथेचं आयोजन करणार असून या संपूर्ण प्रक्रियेचे संकल्पक व आमचे मार्गदर्शक केशव महाराज आबूज रंजेगांवकर यांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत कारण त्यांनीच आम्हाला या सत्कार्याला लावले हे प्रत्यक्षात शक्य झाले असून केवळ जनकल्याण हा त्यांचा गुरुमंत्र आपण आयुष्यभर जोपासणार आहोत. यावर्षीच्या शिव महापुराण कथेच्या सोहळ्याला असंख्य जणांचे हातभार लागले असून काहीच कमी पडले नाही. त्यांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम भव्य दिव्य असाच झाला आहे. व यापुढेही असेच सहकार्य लाभत राहील असे बोलत अण्णा महाराज दुटाळ यांनी सर्वांचे आभार मानले. दरम्यान समस्त वडवणीकरांसाठी हा शिव महापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणी ठरली असून या कथेची सांगता दि.१८ ऑगस्ट २०२४ रविवार रोजी झाली. या शिव महापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस रेणुकामाता संस्थानाचा परिसर गर्दीने तुडुंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

## पान एक वरून

### परवानगिचे पत्र देवूनही गुन्हे

महासचिव प्रशांत वासनिक यांनी म्हटले आहे.बीड पोलिसांनी आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे निषेधनीय आहेत कारण आंदोलन न्यायिक मागण्या घेऊन शांततेत निघाले होते आंदोलनकर्त्यांनी कोणाला आहे दुकाने बंद करा असा दबाव टाकलेला नाही आंदोलनाच्या एक दिवस आधी व्यापारी महासंघाला आपली दुकाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा देण्याचे आवाहन माध्यमां द्वारे केले होते. असे असताना पोलिसांनी जाणीवपूर्वक आंदोलन दाबण्याचे षडयंत्र केले आहे. आंदोलनाच्या काळात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात आले.शहरातून शांततेत आंदोलनकर्त्यांनी आपल्या मागण्यासाठी बंद पाळला होता या उलट डी वाय एस पी गोल्ड व त्यांचे सहकारी अधिकारी यांनी आंदोलनकर्त्यांची जागोजागी केली होती व आंदोलनामध्ये वारंवार हस्तक्षेप करत होते.जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन आंदोलनकर्त्यांनी आपल्या मागण्या शासनाला कळविल्या परंतु सर्व गोष्टी शांततेत होऊन देखील बीड पोलीस प्रशासनाने दाखल केलेले गुन्हे समाजामध्ये तेढ निर्माण करणारे आहेत त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर आमचा आक्षेप आहे.

### जीवन गौरव पुरस्काराने

पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. २०२४ साठीचा जीवनगौरव पुरस्कार रानबा गायकवाड यांच्यासह डी. आर. तुपसुंदर, आंबेडकर गीतांच्या माध्यमातून प्रबोधन करणाऱ्या मुंबई येथील गायिका चंद्रकला गायकवाड, शाहीर नामदेव लहाडे यांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक तथा विचारवंत रानबा गायकवाड यांना यापूर्वी मूकनायक राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार' , शांताबाई शेळके राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार, फिल्म डिव्हिजन ऑफ इंडियाचा पुरस्कार , विद्रोही कवी नामदेव ढसाळ साहित्य पुरस्कार ,गोवा फिल्म फेस्टिवलचा बेस्ट स्टोरी रायटर अवॉर्ड, कलिंगा फिल्म फेस्टिव्हल बेस्ट स्क्रीनप्ले अवॉर्ड,पत्रकारिता क्षेत्रातील जीवन गौरव पुरस्कार, परळी भूषण पुरस्कार , बीड जिल्हा ग्रंथालय संघाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट ग्रंथ लेखक पुरस्कार असे ५० पेक्षा अधिक पुरस्कार आतापर्यंत मिळालेले आहेत.पत्रकारितेच्या क्षेत्रात पंचवीस वर्षापेक्षा अधिक काळापासून रानबा गायकवाड कार्यरत आहेत. फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे मुखपत्र दैनिक सम्राटचे तालुका प्रतिनिधी, साप्ताहिक शिक्षण मार्ग,दै. परळी बुलेटिनचे संपादक म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यांनी पाच पुस्तके, पाच नाटके, पाचपेक्षा अधिक लघुपट,कथा, कवितांचे लेखन केले आहे.त्यांचे सर्जनशील दिग्दर्शक डॉ. सिद्धार्थ तायडे दिग्दर्शित 'भीमयुग' हे क्रांतीकारी आंबेडकरवादी नाटक खूप गाजले आहे.आंबेडकरी चळवळीतील अनेक आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग आहे. पत्रकारिता, सामाजिक कार्य, साहित्य,सिने व नाट्य क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना गौरविण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास प्रसिद्ध लेखक दिग्दर्शक नाटककार प्राध्यापक डॉक्टर सिद्धार्थ तायडे, मुक्ता शिक्षक संघटनेचे नेते सुभाष सवयी,प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत अजय कुमार गंडले ,पत्रकार विकास वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव झीलमेवाड, पाथरीचे युवा उद्योजक धम्मपाल उजगरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमास मराठवाड्यातील वामनदादा कर्डक यांचे अनेक शिष्य प्रबोधनकार भीम गीतकार गायक लोककलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अधिरा फाउंडेशनचे भगवानराव वाघमारे, भीमराव वाघमारे, संजय बगाटे, यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात अनेक भीम गीतकारांनी वामनदादा कर्डक यांच्या जीवनावर आपले गीते सादर केले . दैनिक पुण्यभूमीचे परळी तालुका प्रतिनिधी भगवान साकसमुद्रे यांनी पुष्पगुच्छ देऊन परली त्यांचे स्वागत केले आहे .त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

### कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांच्या

व तंत्रज्ञानाची माहिती घेतली. चारही कृषी विद्यापीठाचे स्टॉल्स या ठिकाणी उभारले असून, तेथील उपक्रमांचीही मुंडेंनी माहिती घेतली. या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या स्टॉल्समध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्यासाठी आणि शेतीमध्ये अधिक समृद्धी आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक बाबी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी व लाभ मिळवावा, असे आवाहन याप्रसंगी धनंजय मुंडे यांनी केले आहे. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक श्री.मुळे, आत्माचे जिल्हा प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांसह अधिकाऱ्यांनी श्री मुंडे यांना माहिती दिली. प्रसंगी पदाधिकारी व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली, त्यालाही शेतकरी बांधवांचा मोठा प्रतिसाद लाभला. हा उपक्रम पुढील चारही दिवस अविरत सुरू राहणार आहे.

### स्टॉल ठिकाणीच धनंजय मुंडे यांचा नाश्ता

काल सकाळपासूनच कार्यक्रमाची लगबग होती. सायंकाळी उशिरापर्यंत जेवणालाही वेळ मिळाला नाही, त्यामुळे सायंकाळी स्टॉल पाहत असतानाच धनंजय मुंडे यांनी स्टॉलवर असलेले विविध मिलेटपासून तयार केलेले खाद्यपदार्थ, फळे यांचा शेतकऱ्यांच्या सोबत आस्वाद घेतला.

### बीडमधून दलाल, भडवे हाकलून

आहे, असा आरोप आंबेडकरी जनतेने केला आहे.

भारतीय संविधान महोत्सवानिमित्त संविधान जागर समिती,महाराष्ट्र यांच्याकडून जागर संविधान यात्रा सुरु आहे. सदरील यात्रा सर्व जिल्ह्यातून प्रवास करत जाणार आहे. संविधानाबद्दल सर्वांना आदर आहे आणि तो असायलाच हवा. परंतू संविधानच्या आडून समाजातलेच काही चोर, भामटे, भडवे, दलाल षडयंत्र रचित असतील तर ही बाब खपवून घेतली जाणार नाही. असे म्हणत बीडच्या आंबेडकरी जनतेने बेईमानांचा जथ्था हाकलून दिला आहे.

### बीडमध्ये बँक्स् असोसिएशनचा

होणार आहे. भारतीय रिझर्व बँकेचे संचालक सतीशजी मराठे, दि महाराष्ट्र अर्बन को ऑफ बँक फेडरेशन लि मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा. दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि मुंबईचे अध्यक्ष विश्वास ठाकूर, दि नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन बँक दिल्लीचे संचालक सुनील देवडा, संचालक दिलीप चव्हाण, मुकुंदकुमार कळमकर या मान्यवर प्रमुखांची उपस्थिती रौप्य महोत्सव समारंभाच्या निमित्ताने राहणार आहे.बँकिंग क्षेत्रातील सर्वांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास शनिवारी सकाळी १०:३० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया, उपाध्यक्ष ड. मकरंद पत्की, सचिव भगवान पवार यांनी केले आहे.

### कमालय, ड्रोन फिरताहेत

दिवसांपासून सातत्याने घडत आहे. दरम्यान बीड बीड जिल्ह्यात हा ड्रोन घिरट्या घालत आहे. धारूर व वडवणी तालुक्यामध्ये वाड्या वस्तीवर व गावांमध्ये हा ड्रोन फिरत असल्यामुळे ग्रामस्थांनी अनेक गावात आता रात्री उशिरापर्यंत गस्त घालण्यास सुरुवात केली. चोरी करण्याच्या दृष्टीने रेकी करण्यासाठी ड्रोन उडवले जात असल्याची चर्चा होती मात्र रात्रीच्या वेळी आकाशात गिरट्या घालणाऱ्या या ड्रोन चा उलगडा लवकरच बीड जिल्हा पोलीस प्रशासन व धारूर आणि वडवणी पोलिस प्रशासन करेल असा विश्वास सर्वसामान्यांमध्ये आहे.

### पोलिसांनो फटाक फोडणाऱ्या

लागूनआहे. शहरातील रस्त्यांवर जोरजोरात आवाज करीत बुलेट चालविणाऱ्या आणि बुलेटच्या सायलेन्सरमधून फटाका फुटल्यासारखे मोठे आवाज करणाऱ्या बुलेट स्वारांची संख्या शहरात दिवसेंदिवस वाढत आहे पोलिसांचे लक्ष नसल्याने वाटेल तिथे आणि वाटेल तेव्हा फटाका फोडल्या सारखे आवाज येत आहेत. एखाद्या नवयुवकाच्या वाढदिवसाला तर फटाक्या ऐवजी बुलेटची फटाके वाजवायची फॅशन सध्या शहरामध्ये आहे. यामुळे वय वृद्ध लहान मुले महिला यांना त्रास होत असून अनेक नागरिकांमधून पोलिसांनी पुढाकार घेऊन कारवाई करावी जनहितासाठी गेवराई पोलिसांनी समोर यावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून होऊ लागली आहे. बुलेट मोटारसायकलवरील अनधिकृत सायलेन्सर सुधारणेसह विविध नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ही वाहने जप्त करता येतात. मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल व कारवाई करता येते हे सामान्य नागरिकांच्या लक्षात येत असून गेवराई पोलिसांच्या लक्षात कधी येणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## पान सहा वरून

### कार्यकर्तृत्वाचा यथोचित

,श्याम उगले (संपादक: दैनिक लोकनामा), दत्ता जायभाये ( संपादक : वंजारी पुकार किनवट ), नितीन ढाकणे ( उत्कृष्ट पत्रकार : संपादक दैनिक अतुल्य महाराष्ट्र), शामराव गीते ( उद्योजक साई सत्यम उद्योग समूह ), अलका सानप (लेखिका व कवयित्री मुंबई), आदींसह मान्यवरांचा यावेळी सन्मान झाला.यामध्ये परळी तालुक्यातील पत्रकार, संपादक नितीन ढाकणे यांना वंजारी समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच त्यांना यापूर्वी 'मूकनायक 'पुरस्कार देऊन परळी येथे दि ३१ जानेवारी रोजी त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला होता. उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. भव्य दिव्य या कार्यक्रमांमध्ये उपस्थित सर्व समाज बांधवांचे स्वागत करून पुरस्कारार्थी मान्यवरांचा यथोचित सत्कार करून त्यांना पुरस्कार देण्यात आला. तसेच पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा ही देण्यात आल्या.

### मागासवर्गीय वार्डात

असल्यामुळे याकडे कॉंग्रेसचे शहराध्यक्ष ताहेर खुरेशी यांनी प्रशासनास तथा सत्ताधाऱ्यास जागे करण्यासाठी आगळे-वेगळे अंदोलन उभे केले आहे. चक्क घाणीच्या व दुर्गंधीयुक्त ठिकाणी एक बॅनर लावले असुन त्यावर केज नगरपंचायत व यश कन्स्ट्रक्शन यांची नावे लिहुन या नावावर चंपालाचा हार घातला आहे. या अनोख्या पद्धतीने लावलेल्या बॅनरची चर्चा शहरात सर्वदुर होताना दिसत आहे.सदरील लावलेल्या बॅनरमुळे केज नगरपंचायतचे सत्ताधारी तथा विरोधक जागे होतील का ? मागासवर्गीय वस्तीला न्याय मिळेल का ? नगसेविका सौ. पल्लवी ओंमप्रकाश राजणकर यांच्या मागासवर्गीय वस्तीतील कामे होतील का ? आदि प्रश्न शहरातील जनतेला पडली आहेत.

### धम्म ज्ञानाने अंधाररुपी

'फुले-शाहू-आंबेडकर' विचारधारेने व तथागतांच्या मैत्री व करुणेच्या जोरावर व तृष्णेपासून दूर राहून निःष्कलंकपणे सेवानिवृत्त झालेले आयु. कल्याणराव भंडारे व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा प्रा.प्रदीप रोडे व उपस्थित सदस्यांनी व महिलांनी यथोचित सत्कार केला. तसेच आपल्या पतीच्या अकाली निधनानंतर आपल्या पाल्यांचे योग्य प्रकारे संगोपन करुन 'शिका-संघटीत व्हा व संघर्ष करा' या डॉ.बाबासाहेबांच्या बहुमोल उपदेशाप्रमाणे शिक्षण पूर्ण केले व कनिष्ठ अभियंता पदापर्यंत पोहचून ग्रामिण पाणीपुरवठा सारख्या महत्वपूर्ण विभागात कार्यरत असलेल्या आयु.मंगलाताई सोनवणे यांनी दान पारमितेचे पालन करत संस्थेची गरज ओळखून पाण्याची टाकी बांधून दिली. तसेच शीलाताई रामटेके यांनी आपल्या भावाकडे धम्मभूमी येथे विहिरीची गरज आहे हे स्पष्ट करुन भावाकडून संपूर्ण विहिर बांधून घेतली. सत्कार प्रसंगी के.डी.भंडारे व शीलाताई रामटेके, मंगलाताई सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त करुन धम्माच्या आचरणाने कुशल कर्म घडते असे स्पष्ट केले. हिरामन उजगरे यांनी सेवानिवृत्तीचा काळ धम्म कार्यासाठी व समाजोपयोगी कार्यासाठी देणार असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या मुख्य देसनेत पूज्य भन्तेजी पुढे म्हणाले की, या पौर्णिमेला महत्वाची घडलेली घटना म्हणजे राजा प्रसेनजीत यांच्या राज्यात अत्यंत क्रुर, हिंसक असलेला डाकु अंगुलीमाल हा तथागताच्या अंगी असलेल्या १० बलातील करुणा, शील व मैत्रीच्या जोरावर तथागतांना शरण गेला व धम्माचे पूर्णपणे आचरण करुन अरहंत पदापर्यंत पोहचला. जो कोणी तथागतांच्या सहवासात येतो तो त्याच्या अंगी असलेल्या तृष्णा,मोह,मद,मोह, मत्सर व वैरीपण अशा सर्व दुर्गुणापासून दूर जातो. तथागतांचे पुष्प-दीप-धुपाने पूजन म्हणजे कर्मकांड नव्हे त्यांच्याकडे काहीही मागणे नाही तर त्यांच्या बहुमोल उपदेशाप्रमाणे जीवन जगणे व दुःख मुक्तीच्या मार्गाचा त्याग करुन सुखाची वाटचाल करणे होय हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. कार्यक्रमास संस्थेचे बहुसंख्य सदस्य बीड, धाराशीव जिल्ह्यातून तसेच शिवणी परिसरातील उपासक, उपासिकांची उपस्थिती होती. शिवणी येथील वर्षावास संयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कालकथीत गयाबाई धोंडीराम वडमारे यांच्या स्मरणार्थ आशाबाई कैलास वडमारे यांनी भोजनदान तर आयु.प्रविण अरुण वाघमारे सहशिक्षक फर्दापूर जि.जळगाव यांनी खिरदान केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.जी.वानखेडे यांनी व्यक्त केले. पूज्य भन्तेजींच्या आशीर्वाद गाथेने व सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

### राष्ट्रीय क्रांती सेना

विलाज होण्यासाठी सर्व सोईनी युक्त दवाखाना , गरिबांच्या मुलांना मोफत चांगले शिक्षण मिळण्यासाठी दवाखाना शाळा , उभारण्याचे तसेच योग्य प्रकारचे दळण - वळण होण्यासाठी सगळीकडे खेड्यापासून शेहरापर्यंत चांगल्या दर्जाचे रस्ते करण्यासाठी प्रयत्न करणार आल्याचे सांगितले . होऊ घातलेल्या विधान सभा निवडणूक विषयी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की राष्ट्रीय क्रांती सेनेच्या विचारांशी एक मत असलेल्या उमेदवारांना सहकार्य करणार असल्याचे सगतांनाच कोणत्याही पक्षाच्या उमेदवाराला पाठींबा दिला जाणार नाही हे आवर्जून सांगितले . मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मनोज जरांगे पाटलाच्या मागणिवर मत पत्रकारांनी विचारले असता ते म्हणाले की मनोज जरांगे पाटलांच्या मी पूर्ण सहमत नाही पण मराठ्यांना क्रिमिलेअर ची अट घालून शिक्षणात आरक्षण मिळाले पाहिजे असे मत व्यक्त केले .बेरोजगारी , मोठा दवाखाना , शाळा रस्ते , एम आय डी सी , या विषयावर लवकरच राष्टीय क्रांती सेना आंदोलन करणार असल्याचे सूतोवाच केले. या पत्रकार परिषदेला भास्कर नाना शिंदे , मुजळदास कुडकर ओबीसी महासंघाचे जिल्हा आध्यक्ष विलास नेमाने, यावल शेख, रवी देशमुख ,हे उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# संस्थेच्या दूरदृष्टीचा विद्यार्थ्यांना होतोय फायदा

## कौतूकास्पद निलज्योती संस्थेने राबविला शैक्षणिक उपक्रम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे संस्थेचे सचिव व ज्येष्ठ पत्रकार डॉ. नंदकुमार उघाडे यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित केली होती . या स्पर्धेत अभिनव पब्लिक इंग्लिश स्कूल दिंद्रुड व जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश स्कूल , घाटजवळा येथील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले . ही सामान्य ज्ञान स्पर्धा दोन गटात आयोजित करण्यात आली .

गट अ : तिसरी ते चौथी आणि गट ब : पाचवी ते सातवी अशा दोन गटात स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. प्रत्येक गटासाठी १०० प्रश्नांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली . ही स्पर्धा इतिहास , भूगोल , भारतीय राज्यपद्धती , समाजसुधारक, मराठी व्याकरण , इंग्रजी व्याकरण , गणित , बुद्धिमत्ता चाचणी व चालू घडामोडी या घटक विषयांसह शालेय अभ्यासक्रमावर घेण्यात आली . या स्पर्धेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांक मिळणारे विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत.





अभिनव पब्लिक स्कूल दिंद्रुड : गट अ : (तिसरी ते चौथी) प्रथम क्रमांक : शिवरुद्र सचिन गौंडर,द्वितीय क्रमांक : वरद सतिश देवकर ,तृतीय क्रमांक : सोहम सचिन जायभाये,गट ब : ( पाचवी ते सातवी ), प्रथम क्रमांक : आदित्य बलभीम लाटे , द्वितीय क्रमांक : प्रज्ञा हरिदास बडे, तृतीय क्रमांक : क्षितिज बालासाहेब मुंडे, जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश स्कूल घाटजवळा ,गट अ :( तिसरी ते चौथी ), प्रथम क्रमांक : कार्तिक कल्याण बोबडे ,द्वितीय क्रमांक : सांस्कृतिक सदिपान शिंदे, तृतीय क्रमांक : प्रथमेश सत्यप्रेम घुमरे, गट ब : ( पाचवी ते सातवी ), प्रथम क्रमांक : वैष्णवी राजाभाऊ ढेपळे , द्वितीय क्रमांक : कृतिका कल्याण बोबडे , तृतीय क्रमांक : सिद्धी नामदेव मोरे, या विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञान स्पर्धेत यश संपादन केल्यामुळे शैक्षणिक व सामाजिक स्तरातून त्यांचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

# उत्कृष्ट कामगिरीने मकासरे सन्मानित!

## अभिनंदनिय :तहसीलदार पाटीलांकडून प्रशस्तिपत्र



राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी तालुका याचे महसूल प्रशासन गतिमान अन् कार्यक्षम बनविण्यासाठी दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल दिपक मकासरे यांना तहसीलदार नामदेव पाटील यांनी प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आलेराहुरी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात तालुक्यातील महसूल प्रशासनात लोकसेवेचा विकसित जाणिवेबदल लोकाभिमुखेचा दुष्टीकोणाबदल हे प्रशस्तिपत्र देण्यात आले आहे

दिपक मकासरे हे राहुरी तालुक्यातील खडाबे खु व खडाबे बु या दोन महसूल विभागात आपली सेवा देत आहेत लोकाभिमुख काम करण्यासाठी ते कायमच तत्पर असतात त्यांना हा पुरस्कार देण्यात आल्या नंतर खडाबे खु व खडाबे बु ग्रामस्थां सह महसूल विभागातील तलाठी भाऊसाहेब यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे दिपक मकासरे यांना हे प्रशस्तिपत्र मिळाल्याबद्दल त्यांचे सामाजिक धार्मिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# विहीरीत पडल्याने शेतकऱ्यांचा मृत्यू!

सोयगाव/प्रतिनिधी



सोयगाव तालुक्यातील पहुरी बुद्रुक येथील शेतकऱ्यांचा पाय घसरून विहीरीत पडल्याने पाण्यात बुडुन मृत्यू झाल्याची घटना घडली असुन सदरील शेतकऱ्यांचा मृतदेह बुधवार (ता २१) सायंकाळी सात वाजता आढळला

मृत शेतकरीचे नाव काकासाहेब भागाजी सपकाळ (वय ३९ )असे आहे

पहुरी बुद्रुक शिवारात गट न. ३७ मध्ये विठ्ठल सपकाळ व काकासाहेब सपकाळ ह्या दोघे भावाच्या नावे तीन एकर जमिन असुन त्या जमिनीत कपाशी पिकाची लागवड करण्यात आली आहे बुधवार (ता २१)सकाळी काकासाहेब सपकाळ हे काही कामानिमित्त शेतात गेले असता सायंकाळी उशिर झाला तरी घरी न आल्याने घरची मंडळी व ग्रामस्थांनी शोधाशोध केली असता चंद्रभान शेळके यांना काकासाहेब सपकाळ यांचा मृतदेह विहिरीत दीसला त्यानुसार पोलिस पाटील यांनी बनोटी पोलीस चौकीत खबर दील्यावरुन घटनास्थळी जावून उपनिरीक्षक रज्ञाक शेख, जमादार संदीप सुसर, राजेंद्र बर्डे, श्रीकांत तळेगावकर यांनी ग्रामस्थांच्या मदतीने रात्री आठ वाजता विहीरीतुन मृतदेह बाहेर काढण्यात आला सदरील काकासाहेब सपकाळ यांची उत्तरीय तपासणी पाचोरा येथील सामान्य रुग्णालयात करण्यात आली व गुरुवार (ता २२ )दुपारी बारा वाजता पहुरी बुद्रुक येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,एक भाऊ असा परिवार आहे

# अत्याचाराच्या निषेधार्थ कॅन्डल मार्च

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर येथे चार वर्षीय बालीकांवर एका नराधमाकडून अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. तसेच कोलकाता येथे महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर अत्याचार करून खूण करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ आज आरपीआय व जयभीम मित्र मंडळाच्या वतीने कॅडल मार्च चे आयोजन करण्यात आले. या बाबत प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे चार वर्षीय दोन बालीकांवर एका नराधमाकडून अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. तसेच कोलकाता येथे महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर अत्याचार करून तीचा निर्घृण खूण करण्यात आला. या घटना आपल्या देशाला, महाराष्ट्राला व मनुष्य जातीला काळीमा फासणा-या घटना आहेत. या घटनेच्या निषेधार्थ तसेच या घटनेतील नराधमांवर कठोर कारवाई व्हावी. आणि असे गुन्हे भविष्यात होऊ नयेत, म्हणून कठोर कायद्यांची निर्मिती व्हावी. या मागणीसाठी राहुरी



येथील आरपीआय आठवले गट व जयभीम मित्र मंडळाच्या वतीने आज दि. २३ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजता राहुरी शहरातून कँडल मार्च काढून निषेध नोंदविण्यात येणार आहे. या कॅडल मार्च मध्ये शहर व तालुक्यातील तमाम तरुण व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आरपीआय तालूकाध्यक्ष विलास साळवे यांनी केले.

कॅण्डल मार्च महसूल व पोलीस प्रशासनाला निवेदन देते वेळी आरपीआय तालूकाध्यक्ष विलास साळवे, उपाध्यक्ष सुनिल चांदणे, अरुण साळवे, दीपक साळवे, प्रतीक रूपटक्के, पंची शिरसाठ, रॉबर्ट शॅमियल, राजु दाभाडे, सुनील पंडित, नवीन साळवे, रवींद्र कर्डक, रोहित गायकवाड, बाळासाहेब म्हस्के, राजू बागुल, विशाल साळवे, रोहन शिंदे, बाळू पटारे, नागेश वाव्हळ, सागर साळवे, विकास साळवे, बबलू कर्डक, बाळू म्हस्के, नितीन आघाव, मनोज बोर्डे, संकेत साळवे, शैलेंद्र गुजर, कैलास साळवे, बंटी हिवाळे आदि उपस्थित होते.

# पिसाळलेल्या कुत्र्याने तोडले झोपेत लचके

## जरंडी येथील घटना;नागरिक भयभित

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

रात्रीच्या वेळी अंगणातील ओट्यावर झोपलेल्या वृद्धावर पिसाळलेल्या कुत्र्याने हल्ला चढवला यामध्ये झोपेत असलेल्या ८० वर्षीय वृद्धाला गंभीर जखमी केल्याची घटना जरंडी येथे बुधवार (दि.२१) रात्री एक वाजता घडली आहे

लक्ष्मण झिंगा बोरसे(वय ८०) असे पिसाळलेल्या कुत्र्याच्या हल्ल्यात जखमी वृद्धांचे नाव आहे त्याना तातडीने उपचारासाठी जळगावच्या सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे दरम्यान जरंडी गावात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा अचानक धुमाकूळ सुरू झाला आहे गाव परिसरात रोजच नवीन नवीन श्वान आढळतात त्यामुळे ग्रामस्थ चकित झाले असून बाहेर गावातून वाहनाद्वारे ही मोकाट व पिसाळलेली श्वास गावात अज्ञात व्यक्ती सोडून देत असल्याचे ग्रामस्थ सांगत आहे त्यामुळे गावात शंभर वर मोकाट श्वान धुमाकूळ घालत आहे.

# महाराष्ट्र बंद समर्थनात परळी बंद!

## बहादुरभाई :व्यापारी बांधव, नागरिकांनी सहभागी व्हावे

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापुरात दोन चीमुकल्यांवर झालेल्या अत्याचार प्रकरणी परळी शहर काँग्रेस वतीने शहर काँग्रेस पक्षाच्या काँग्रेस मध्यवर्ती कार्यालयात शहराध्यक्ष बहादुरभाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली असुन रविवार दि.२४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेसह महाविकास आघाडीने दिली आहे या महाराष्ट्र बंदच्या हाकेला परळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी साथ देत परळी बंद पुकारला आहे तरी परळी शहरातील सर्व व्यापारी बांधवांनी या बंद मध्ये सहभागी व्हावे असे नम्र आवाहन केले आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्या आदेशावरून आज परळी शहर काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयात काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते यांची शहराध्यक्ष बहादुरभाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.या बैठकीत बदलापूर आणि कोलकत्ता येथील घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.याबैठकीत सविस्तर



चर्चा करण्यात आली.राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष जिवनराव देशमुख, उध्दव ठाकरे गटाचे भोजराज पालीवाल, सी.पी. एम.चे अँड अजय बुरांडे व इतर महाविकास आघाडीच्या घटक पक्षाच्या प्रमुखांशी संवाद समन्वय साधुन महाराष्ट्र बंद मध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन या घटनेचा निषेध नोंदवून बदलापूर आणि कोलकत्ता येथील घटनेचे प्रकरण फास्टट्रँक न्यायालयात चालवुन या नराधमांना फाशी देण्यात यावी या मागणीसाठी परळी बंद मध्ये सहभागी व्हावे असे काँग्रेस पक्षाच्या वितिने करण्यात आले आहे. या बैठकीला उपाध्यक्ष सुभाषराव देशमुख, वैजनाथ गडेकर, एतेशाम खतीब, सरचिटणीस शिवाजीराव देशमुख, अनुसूचित जाती अध्यक्ष दिपक सिरसाट, कोषाध्यक्ष फरकुद आली बेग, विधान सभा अध्यक्ष रंजीत देशमुख, शेख बबु शेख बाबा, अल्प संख्याक अध्यक्ष रसुल खान, अल्प संख्याक तालुका अध्यक्ष शेख सदाम, प्रवकते बदर भाई, ओ बी सी शहर अध्यक्ष जावेद भाई शेख जावेद अदी काँग्रेस पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

# बदलापुर घटनेच्या निषेधार्थ मुकमोर्चा!

## आक्रमक : अत्याचाराच्या घटनांनी देश हादरला

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर मधील त्या अमानुष अत्याचाराच्या निषेधार्थ गुरुवारी (ता.२२) सकाळी दहा वाजता महाविकास आघाडीच्या वतीने शहरातून मूक मोर्चा काढून शासनाचा व त्या दुर्दैवी घटनेचा निषेध केला यावेळी ज्योती ताई काळे यांनी मुकमोर्चा समारोप च्या मार्गदर्शनात सांगितले सरकारने लाडक्या बहिणींना दिलेल्या त्या पंधराशे रुपयांची किंमत काय असा सवाल थेट राज्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना करून लाडक्या बहिणींच्या मुली जर सुरक्षित नसतील तर त्या पंधराशे रुपयात काय जहर आणून खायचे काय असा प्रश्न मोर्चा च्या माध्यमातून शासनाला उपस्थित केला



शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून सुरू झालेल्या विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या मूक मोर्चा व्यापारी गल्ली,नारळी बाग भागातून छत्रपती शिवाजी महाराज चौकात आला याठिकाणी समारोपाच्या प्रसंगी ज्योतीताई काळे यांनी मुलींच्या आई वडिलांना ही उपदेश देत मोबाईल चे एक बटन सुद्धा घातक ठरते त्यासाठी आई वडिलांनिही लक्ष द्यावे राज्यातील ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे बदलापूर च्या त्या अमानुष घटनेचा निषेध करून महिलांच्या अत्याचाराचा तपास करणारच नाही असे सरकारने एकदाचे जाहीर करून टाका अन्यथा महिलांना सुरक्षा द्या लाडक्या बहिणीपेक्षा सुरक्षित बहिणीची गरज भासू लागली आहे असे ही त्यांनी सांगितले यावेळी महाविकास आघाडीचे विठ्ठल बदर पाटील,शिवसेना तालुका प्रमुख (उद्धव ठाकरे गट,) दिलीप मचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) शहराध्यक्ष रवींद्र काळे तालुकाध्यक्ष डॉ इंद्रजित सोळुंके तालुका काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष राजू काळे ,रघुनाथ चव्हाण,शहराध्यक्ष दिनेश हजारी,रवींद्र काटोले, भरत पगारे, विजय काळे, भैया जुनघरे, सुधाकर सोहनी,अरुण सोहनी, अजय नेरपगारे,बबन रोकडे,ज्योती स्वामी, निर्मला बोराडे आदींसह महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ शिरीष पवार आदींची मुकमोर्चा मध्ये उपस्थिती होती यावेळी महाविकास आघाडी च्या वतीने ज्योतीताई काळे,विठ्ठल बदर पाटील,रवींद्र काळे यांनी तालुका प्रशासनाला निषेधाचे निवेदन दिले आहे.

## धोकादायक प्रादेशिक परिवहन विभागाचे दुर्लक्ष

# लालपरीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशी!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाच्या सोयगाव आगार व चाळीसगाव जि. जळगाव आगाराच्या बसगाड्या मध्ये बसगाड्या मध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची धोकादायक वाहतूक केली जात असल्याने प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी वाहतूक करणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बस गाड्यावर प्रादेशिक परिवहन विभाग छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन विभाग या बसगाड्या वर कार्यवाही करतात की मेहरबानी करतात असा सवाल आता नागरिकांमधून विचारला जात आहे. दरम्यान सोयगाव आगाराच्या सोयगाव-बनोटी, चाळीसगाव-जामनेर (नागद-बनोटी मार्गे), चाळीसगाव आगाराची सोयगाव मार्गे जाणारी चाळीसगाव-बुलढाणा या बसगाड्या मध्ये



क्षमतेपेक्षा जास्त व चालकाच्या कॅबिन मध्ये प्रवाशी बसवून वाहतूक केली जात आहे. कॅबिन मध्ये बसलेल्या प्रवाशांमुळे चालकास वाहकाची बाजू दिसत नाही व प्रवाशी जवळ बसले असतांना मन विचलित होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्या अशी प्रवाशी वाहतुक करून प्रवाशांच्या जीवाशी खेळत आहे. बसगाड्यांचे अनेक अपघात झाले असून यात अनेक प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे तर अनेक कुटुंब उध्वस्त झाली आहे. एमएच २० बीएल २३२७ या सोयगाव आगाराच्या बसची तर अशी दुरावस्था झाली आहे मागील बाजूचे डिकीचा दरवाजा पडण्याच्या मार्गावर असतांना देखील बसचालकाने त्याकडे दुर्लक्ष करीत बस चालवत सोयगाव येथे आणली. सुदैवाने काही अपरिहार्य दुर्घटना घडली नाही. चालक कॅबिन मध्ये प्रवाशी बसवून वाहतूक करीत असून त्यांच्यावर सोयगाव आगारप्रमुख काय कार्यवाही करतात याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन विभागाकडून खाजगी वाहनांवर कार्यवाही केली जाते. मात्र क्षमतेपेक्षा जास्त जीवघेणी वाहतूक करणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांवर कार्यवाही करीत नसल्याने कायदा फक्त सर्वसामान्यांसाठीच आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. झोपेचं सोंग घेतलेल्या प्रादेशिक परिवहन विभाग राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांवर कार्यवाही करणार की फक्त बघायची भूमिका घेऊन गोरगरीब प्रवाशांचा जीव टांगणीला लावणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# ...अन्यथा बँकेला ठोकणार टाळे

## मनोज पेरे:सीबीआयने शेतकऱ्यांची अडवणूक करु नये



पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज राजा पिंप्री येथे सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा पिंपरी राजा च्या वतीने शेतकऱ्यांची करण्यात येणारी अडवणूक, शासनाच्या विविध योजनेखाली शेतकऱ्यांच्या खात्यावर येणाऱ्या पैशाला बँकेतर्फे लावण्यात येणारा होल्ड,निराधार महिलेसाठी येणारे अनुदान ,अण्णासाहेब पाटील विकास आर्थिक महामंडळातर्फे मराठा तरुणांना उद्योगासाठी देण्यात येणारा कर्जपुरवठा न करता करण्यात येणारी अडवणूक आदी बाबींसाठी युवक,शेतकरी, शेतमजूर व महिलांना वारंवार होणाऱ्या त्रासामुळे आज शिवसेना तालुकाप्रमुख पैठण श्री मनोज पेरे यांनी सेंट्रल बँक चे मॅनेजर श्री अजितकुमार यांचा शिवसेना पद्धतीने समाचार घेतला.

आठ दिवसात जर शेतकरी ,महिला व युवा वर्गांचे कामे मार्गी लागले नाही तर बँकेला टाळे ठोकण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला.यावेळी शिवसेना उपविभाग प्रमुख रवींद्र चौधरी ,राष्ट्रवादी शरद पवार कार्याध्यक्ष गौतम भाऊ साळवे, युवा सेना विभाग प्रमुख बळीराम चव्हाण ,उप तालुका संघटक ग्रामीण श्री प्रतीक गावंडे, गटप्रमुख नारायण घोरपडे, शाखाप्रमुख ज्ञानेश्वर पंडित, शालिकराम घोरपडे व शिवसेना पदाधिकारी शेतकरी वर्ग महिला वर्ग उपस्थित होते.

# कलाकारांच्या खात्यात १५ हजार रूपये मानधन जमा

## राज्यशासनाचे मानले आभार : मानधन मंजूर झालेल्या ज्येष्ठ कलाकारांचा वेंगुर्लेत भाजपच्या वतीने सत्कार




**वेंगुर्ले (प्रतिनिधी)**

राजश्री शाहु महाराज कलाकार मानधन समितीने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १०० कलाकारांचे प्रस्ताव गणेशोत्सवापुर्वी मंजूर करुन कलाकारांच्या खात्यात तीन महिन्यांचे १५००० रूपये जमा करून राज्य सरकारने ज्येष्ठ कलाकारांचा गणेशोत्सव गोड केला. वेंगुर्लेत भाजपाच्या वतीने तालुक्यातील निवड झालेल्या कलाकारांचा सत्कार ह.भ.प. सावळाराम कुर्ले बुवा व प्रदेश का.का. सदस्य शरद चव्हाण याच्या हस्ते शाल व पुष्प देऊन कार्यालयात करण्यात आला. त्यामुळे कलाकारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी राज्यशासनाने आभार मानले. पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी संतोष कानडे यांना अध्यक्ष व शैलेश जामदार यांना उपाध्यक्ष करुन त्याच्या नेतृत्वाखाली राजश्री शाहु महाराज कलाकार मानधन समिती गठीत केल्यावर दोन बैठकीत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील २०० कलाकारांच्या प्रस्तावांना आतापर्यंत मंजुरी दिली. त्यामुळेच गेली ८ ते १० वर्षे प्रतिक्षेत असलेल्या गोरगरीब कलाकारांना न्याय मिळाला. त्यामुळेच कलाकारांनी धन्यवाद दिले. भाजपा वेंगुर्ले तालुका कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये तालुक्यातील लक्ष्मण गोविंद खानोलकर (खानोली), संदिप रामचंद्र हळदणकर (दाभोली), पांडुरंग नारायण मोंडकर (आरवली), बस्त्याव बावतिस ब्रीटो (उभादांडा), सुनिल नारायण तायशेटे (परुळेबाजार), अरविंद सदाशिव नवार (उभादांडा), प्रदिप मधुकर गवंडे (परबवाडा), शामसुंदर वेणुनाथ कोळंबकर इत्यादी कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रसंन्ना उर्फ बाळु देसाई, तालुकाध्यक्ष सुहास गवंडळकर, मा.नगराध्यक्ष राजन गिरप , जि.का.का. सदस्य मनवेल फर्नांडिस व वसंत तांडेल, जिल्हा निमंत्रित साईप्रसाद नाईक, मा.सभापती निलेश सामंत, ता. सरचिटणीस बाबली वायंगणकर, मच्छिमार नेते दादा केळुसकर, सरपंच संघटनेचे विष्णु उर्फ पपु परब, ता.चिटणीस समीर कुडाळकर, अल्पसंख्याक सेलचे सायमन आल्मेडा, अणसुर सरपंच सत्यविजय गावडे, दिव्यांग आघाडीचे सुनिल घाग, किसान मोर्चाचे आरोलकर, महेश खानोलकर, संजु प्रभु , किशोर रेवंणकर, गजानन कुबल इत्यादी उपस्थित होते.

# इन्सुली उपसरपंचपदी भाजपच्या वर्षा सावंत बिनविरोध




इन्सुलीच्या नवनिर्वाचित उपसरपंच वर्षा सावंत यांचे अभिनंदन करताना अशोक सावंत, कास सरपंच प्रवीण पंडित, मानसी धुरी, स्वागत नाटेकर व अन्य. (छाया : प्रवीण परब)

**बांदा (प्रतिनिधी)**

इन्सुली गावच्या उपसरपंचपदी अपेक्षेप्रमाणे भाजपच्या सदस्या सौ. वर्षा सावंत यांची बिनविरोध निवड झाली. इन्सुली ग्रामपंचायत सभागृहात उप सरपंच पदासाठी निवडणूक प्रक्रिया संपन्न झाली. मात्र, यासाठी केवळ वर्षा सावंत यांचा एकमेव अर्ज सादर झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे ग्रामविस्तार अधिकारी ज्ञानदेव चव्हाण यांनी सांगितले.

यावेळी सरपंच तात्या वेंगुर्लेकर, कास सरपंच प्रवीण पंडित, निवृत्त पोलीस निरीक्षक अशोक सावंत, माजी जि. प. सभापती गुरूनाथ पेडणेकर, माजी पं. स. सभापती मानसी धुरी, ग्रामपंचायत सदस्या नमिता नाईक, राधिका सावंत, स्वागत नाटेकर, दत्ता खडपकर, माजी सरपंच अश्विनी परब, नाना पेडणेकर, पूजा पेडणेकर, माजी उपसरपंच कृष्णा सावंत, काका चराटकर, ज्ञानेश्वर राणे, आदी उपस्थित होते.

उपसरपंच कृष्णा सावंत यांनी पक्षीय धोरणनुसार राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. उपसरपंच पदासाठी आज बुधवारी निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. सकाळी नामनिर्देशन दाखल करताना सौ. वर्षा सावंत यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला. अन्य उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने वर्षा सावंत यांची बिनविरोध निवड झाली. वर्षा सावंत या डोबाशेळ, क्षेत्रफळ, कोठावळेबांध व माडभाकर प्रभागाचे प्रतिनिधित्व करतात. निवडणूक अधिकारी म्हणून ज्ञानदेव चव्हाण यांनी काम पाहिले.

इन्सुली गावच्या विकासासाठी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी आणण्याचा प्रयत्न करेन. गावातील महिलांसाठी रोजगाराभिमुख योजना कशा राबवता येईल याकडे लक्ष देईन. पक्षीय हेवेदावे बाजूला ठेवून सर्वांना एकत्र घेऊन गावच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवीन. गावातील रस्त्यांचा प्रश्न, वीजेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्न करेन. तसेच शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवेन, अशी ग्वाही नवनिर्वाचित उपसरपंच सौ. वर्षा सावंत यांनी दिली.

यावेळी माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष अजय कोठावळे, सचिन दळवी, राजन गावडे, नितीन राऊळ, महेंद्र सावंत, अजय सावंत, महेंद्र पालव, संजय पालव, उमेश पेडणेकर, महेश धुरी , औदुंबर पालव , दादा परब, स्वामी पेडणेकर, जयराम पालव, सुर्या पालव, रामा पालव, उमेश परब, मयुर परब, प्रदीप सावंत, अश्विनी परब, सुषमा पालव, प्रभाकर धुरी आदी सह इन्सुली ग्रामस्थ उपस्थित होते.

# रोणापाल माऊली मंदिरात शाळकरी मुलांची दिंडी लक्षवेधी



रोणापाल माऊली मंदिरात वीणा सप्ताह सोहळ्यात शाळकरी मुलांची दिंडी लक्षवेधी ठरली. (छाया : प्रवीण परब)

**बांदा (प्रतिनिधी)**

रोणापाल येथील श्री देवी माऊली मंदिरात वार्षिक वीणा सप्ताह सोहळा उत्साहात साजरा झाला. दोन दिवस झालेल्या या सोहळ्यात गावातील विविध मंडळांनी भजनसेवा सादर केली. दहीकाल्याने या सोहळ्याची सांगता झाली. सोहळ्यात शाळकरी मुलांनी काढलेली दिंडी लक्षवेधी ठरली. टाळ चिपळीच्या तालावर विठ्ठल नामाचा जयघोष करीत शाळकरी मुलांनी मंदिर परिसर दणाणून सोडला. देवस्थान समिती अध्यक्ष प्रकाश गावडे यांनी दिंडीचे स्वागत केले. यावेळी देवस्थान समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामदास कदम यांना आवरण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी करणार : राजन तेली

## वक्तव्याचा निषेध : माफी मागण्याचीही मागणी

**सावंतवाडी (प्रतिनिधी)**




सावंतवाडी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना माजी आमदार राजन तेली सोबत भाजपा कृषी मोर्चा जिल्हाध्यक्ष अजय सावंत

रामदास कदम यांचे आता वय झाले आहे. ते केवळ आपल्या मतदारसंघापुरते नेते राहिले आहेत. लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघात देखील ते महायुतीच्या उमेदवाराला मताधिक्य देऊ शकले नाहीत. त्यामुळे रवींद्र चव्हाण यांच्यावर बोलण्याचा त्यांना नैतिक अधिकार नाही. त्यांच्या वक्तव्यामुळे महायुतीमध्ये दरी निर्माण होत असल्याने त्यांना आवरण्याची मागणी आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार आहोत.

तर रामदास कदम यांनी युती बिघडवण्याचे काम केले आहे त्यामुळे जोपर्यंत रामदास कदम हे रवींद्र चव्हाण यांची जाहीर माफी मागत नाहीत तोपर्यंत महायुती म्हणून भाजपकडून कोणतीही मदत केली जाणार नाही, असा इशारा भाजपचे सावंतवाडी विधानसभा मतदारसंघ प्रमुख राजन तेली यांनी दिला. यावेळी त्यांनी रामदास कदम यांच्या त्या वक्तव्याचा जाहीर निषेधही केला. सावंतवाडी येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अजय सावंत उपस्थित होते. खा. नारायण राणे हे कोकणचे नेते आहेतच. लोकसभा निवडणुकीत त्यांच्यावर महाराष्ट्राची जबाबदारी होती. तर रविंद्र चव्हाण यांच्यावर कोकणची जबाबदारी देण्यात आली होती. ती त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. पक्ष संघटना बळकट करण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत. त्यात त्यांनी वेळोवेळी यशही प्राप्त केले आहे. तर दुसरीकडे लोकसभा निवडणुकीत रामदास कदम यांच्याच मतदारसंघात महायुतीला ८ हजार ५०० मतांचा फटका बसला आहे. त्यामुळे जे स्वतःचा मतदारसंघ सांभाळू शकत नाहीत त्यांनी रवींद्र चव्हाण यांच्यावर बोलण्याची हिंमत करू नये, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# महामार्ग व सर्विस रोडवरील खड्डे आठ दिवसांत बुजविणार

## महामार्ग प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांचे मळगाव येथे भेटीदरम्यान आश्वासन

**सावंतवाडी (प्रतिनिधी)**



झाराप पत्रादेवी महामार्ग व लगतच्या सर्विस रोडवरील खड्ड्यांची पाहणी करताना महामार्ग प्राधिकरणचे अधिकारी, सोबत माजी सभापती राजू परब, मळगांव सरपंच हनुमंत पेडणेकर, दीपक जोशी व अन्य ( सचिन रेडकर )

मुंबई गोवा महामार्गाच्या झाराप ते पत्रादेवी महामार्गावरील मळगाव येथे महामार्ग तसेच लगतच्या सर्विस रोडवर पडलेले सर्व खड्डे सिमेंट कॉंक्रीटने आठ दिवसात भरण्यात येतील असं आश्वासन महामार्ग प्राधिकरणचे उपअभियंता साळुंखे यांनी दिले. मळगाव येथील महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांची त्यांनी पाहणी केली. यावेळी माजी सभापती राजू परब व मळगाव सरपंच हनुमंत पेडणेकर, शाखा अभियंता कांबळे, ग्रामपंचायत सदस्य अनुजा खडपकर, दीपक जोशी, साईश केरकर, सुरज राऊळ यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. झाराप पत्रा देवी महामार्गावर मळगाव परिसरात मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून वाहनधारकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागत आहेत. या पार्श्वभूमीवर माजी सभापती राजू परब तसेच मळगाव सरपंच हनुमंत पेडणेकर यांनी महामार्ग प्राधिकरणचे उपअभियंता साळुंखे यांना प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी बोलवून घेतले. यावेळी माजी सभापती राजू परब यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी सदर महामार्गाच्या कॉंक्रिटीकरांचे काम मंजूर झाले असून त्याची वर्क ऑर्डर न झाल्याने काम सुरू करता आले नाही अशी सारासारव अभियंता साळुंखे यांनी करीत वरिष्ठांकडे बोट दाखवले. यावेळी सरपंच हनुमंत पेडणेकर यांनी थेट रत्नागिरी येथील मुख्य कार्यकारी अभियंतांना फोन लावत याबाबत माहिती जाणून घेतली. त्यानंतर गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आठ दिवसात खड्डे सिमेंट कॉंक्रीटने बुजवण्यात येतील, असे आश्वासन साळुंखे यांनी दिले.

# निवृत्त पशुवैद्यकीय विस्तार अधिकारी डॉ. बळवंत राणे यांचे निधन

**मसुरे ( प्रतिनिधी)**



मालवण तालुक्यातील मूळ पेंडूर येथील डॉ. बळवंत प्रभाकर राणे (६२ वर्ष) यांचे नुकतेच निधन झाले. पशुवैद्यकीय विस्तार अधिकारी म्हणून ते सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये काम करून सेवानिवृत्त झाले होते. आपल्या शासकीय सेवेदरम्यान त्यांनी आचरा, कनेडी शिरोडा, कुडाळ आणि मसुरेत पशुवैद्यकीय विस्तार अधिकारी म्हणून काम केले होते. सामाजिक कला क्रीडा क्षेत्रामध्ये त्यांचे योगदान मोठे होते. अनेक गरजवंतांना त्यांनी वेळोवेळी मदतीचा हात दिला होता. जिल्हा परिषद मध्ये प्रशासकीय कामकाज अतिशय चांगले असल्यामुळे त्यांना वेळोवेळी विविध पुरस्कार मिळाले होते. गोरगरीब जनतेचा आधारवड म्हणून त्यांचा नावलौकिक होता.

त्यांच्या पश्चात आई, दोन मुली, एक मुलगा, पत्नी, सून, दोन बहिणी, दोन भाऊ, नातू, भाचे असा मोठा परिवार आहे. युवा सामाजिक कार्यकर्ते प्रथमेश उर्फ बाबा राणे यांचे ते वडील होत.

# कणकवलीत भाजपा पदाधिकाऱ्यांनी रामदास कदम यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला मारले जोडे

**कणकवली**

राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या विषयी रामदास कदम यांनी केलेल्या वक्तव्याविषयी कणकवली तालुक्यातील भाजपा पदाधिकाऱ्यांनी तीव्र निषेध नोंदवीत भाजपा पदाधिकाऱ्यांनी कणकवली शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रामदास कदम यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारले.



यावेळी गली गली मे शोर हाई ... रामदास कदम चोर है, नीम का पत्ता कडवा है .... रामदास कदम भडवा है, रवींद्र चव्हाण तुम आगे बढो ... हम तुम्हारे साथ है, नितेश राणे तुम आगे बढो ... हम तुम्हारे साथ है अशा घोषणा दिल्या. यावेळी माजी सभापती दिलीप तळेकर यांनी यांनी तीव्र स्वरूपात आपल्या भावना व्यक्त करताना यापुढे जशास तसे उत्तर देण्यात येईल असे स्पष्ट केले.

दरम्यान अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत रामदास कदम यांच्या पुतळ्यावर होणारे जोडो मारो रोखले. तर शहराध्यक्ष आण्णा कोदे म्हणाले, महायुती म्हणून आम्ही आमच्या नेत्यांवर कोणीही काही बोलेल ते सहन करणार नाही. तसेच याबाबत आमही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र देऊन लक्ष वेधणार असल्याचेही सांगितले. यावेळी तालुकाध्यक्ष मिलिंद मेस्त्री, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष संदीप मेस्त्री, पप्पू पुजारे, दिलीप तळेकर, सोनू सावंत, शहराध्यक्ष अण्णा कोदे, सोनू सावंत, सचिन पारधिये, विजय इंगळे यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बॅ.नाथ पै यांचे ज्येष्ठ पुत्र आनंद पै यांचे निधन

**वेंगुर्ले (प्रतिनिधी)**



वेंगुर्लेचे सुपुत्र संसदरत्न व सीमालढ्यात अत्यंत मोलाची भूमिका बजावणारे नेते, माजी खासदार बॅरिस्टर नाथ पै यांचे ज्येष्ठ पुत्र आनंद पै यांचे २० ऑगस्ट रोजी स्पेनमध्ये हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले.

आनंद पै यांचा मुंबई येथे जुलै १९६१ मध्ये जन्म झाला होता. बॅरिस्टर नाथ पै यांचे जानेवारी १९७१ मध्ये निधन झाल्यावर त्यांच्या पत्नी क्रिस्टल यांनी पुत्र दिलीप तसेच आनंद यांच्यासोबत व्हिएन्ना येथे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी आनंद हे १० वर्षांचे होते. आनंद पै हे अलिकडेच आयटी क्षेत्रातील नोकरीतून निवृत्त झाले होते. आनंद यांना वडिलांप्रमाणेच वाचनाची आवड होती आणि त्यांना साहित्य, वास्तुकला आणि तंत्रज्ञानात रस होता. ते एक उत्सुक प्रवासी होते. त्यांनी आयुष्यभर भारतावर प्रेम केले आणि दर काही वर्षांनी त्यांनी मुंबईला घरी भेट दिली.

त्यांची सर्वात अलीकडील मुंबई भेट नोव्हेंबर २०२३ मध्ये होती. आनंद पै यांच्यामागे परिवारात जोडीदार मारिया आणि धाकटे बंधू दिलीप असून ते ऑस्ट्रिया येथे वास्तव्यास आहेत. आनंद पै यांच्या निधनामुळे वेंगुर्ले शोककळा पसरली आहे. वेंगुर्ले येथे बॅरिस्टर नाथ पै यांचा जन्म व शिक्षण झाले. त्यामुळे त्यांचे आठवण म्हणून वेंगुर्ला येथे नाथ पै स्मारक उभारले जात आहे. याचा लोकार्पण सोहळा या कार्यक्रमाला संसदपटू व वेंगुर्ल्याचे सुपुत्र बॅरिस्टर नाथ पै यांचे ज्येष्ठ पुत्र आनंद पै हे भारतात वेंगुर्ले येथे येणार होते.

# पारंपरिक साज रिक्षा सजावट स्पर्धेत वरद धुरी विजेता

## भाजपा नेते निलेश राणे पुरस्कृत आणि पर्यटन व्यवसाय महासंघ आयोजित स्पर्धा

**मालवण (प्रतिनिधी)**




भाजपा नेते निलेश राणे पुरस्कृत आणि पर्यटन व्यवसाय महासंघ आयोजित रिक्षा सजावट स्पर्धेतील विजेत्याना भाजपा पदाधिकाऱ्यांनी गौरवले. (अमित खोत, मालवण)

नारळी पौर्णिमेनिमित्त भाजपा नेते निलेश राणे पुरस्कृत आणि पर्यटन व्यवसाय महासंघ आयोजित रिक्षा सजावट स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेस उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. पारंपरिक साज करून सजावण्यात आलेल्या रिक्षा व बाजारपेठ मार्गे निघालेली रॅली आकर्षण ठरली. स्पर्धेत प्रथम क्रमांक वरद धुरी यांनी १५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक खडपकर यांना १० हजार रुपये, तृतीय क्रमांक गणेश लुडबे यांना ५ हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच उत्तेजनार्थ स्पर्धक दिनेश किडये, सुभाष मांजरेकर, विठोबा वायंगणकर, जॉनी मेंडीस, राजू डींगणकर, राजा मांजरेकर यांना सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचे उदघाटन निलेश राणे यांच्या हस्ते झाले. यावेळी पर्यटन महासंघ अध्यक्ष बाबा मोंडकर, तारकर्ली पर्यटन विकास संस्था अध्यक्ष सहदेव साळगावकर, रवींद्र खानविलकर, उद्योजक केदार झाड, देवानंद लोकेगावकर, दर्शन वेंगुर्लेकर यांसह भाजपा पदाधिकारी जिल्हा उपाध्यक्ष अशोक सावंत, तालुकाध्यक्ष धोंडी चिंदरकर, जिल्हा बँक संचालक बाबा परब, महेश मांजरेकर, माजी नगराध्यक्ष सुदेश आचरेकर, दीपक पाटकर, पंकज सादये, आप्पा लुडबे, संचालक आबा हडकर, मोहन वराडकर, किशोर खानोलकर, शिवसेना माजी सचिव किसन मांजरेकर, माजी उपसभापती राजु परुळेकर, राजु बिडये, भाई मांजरेकर, बंड्या पराडकर, राकेश सावंत, मंदार लुडबे, अभी लाड, ललित चव्हाण, निषय पालेकर, जॉमी ब्रिटो, ओम तोडणकर, संदीप भोजने, यांसह भाजपा महिला तालुकाध्यक्ष पुजा करलकर, शहर अध्यक्षा चारू आचरेकर, अध्यक्षा राणी पराडकर, वैष्णवी मोंडकर, माजी नगरसेविका शर्वरी पाटकर, ममता वराडकर, महानंदा खानोलकर, पूजा सरकारे, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष पुजा वेरलकर, तारका चव्हाण, तुलसी चव्हाण, महिमा मयेकर, अमिता निव्हेकर, दिव्या कोचरेकर यांसह पर्यटन व्यावसायिक, भाजपा, शिवसेना कुडाळ मालवण प्रमुख बबन शिंदे, तालुकाप्रमुख राजा गांवकर, माजी सचिव किसन मांजरेकर, युवसेना जिल्हप्रमुख ऋत्विक सामंत, युवती सेना जिल्हाप्रमुख सोनाली पाटकर, तसेच रिक्षा प्रतिनिधी पप्या कद्रेकर, निलेश लुडबे, धनेश हडकर, हेमंत कांदळकर, मनोज धुरी आदी उपस्थित होते.

# नीलेश पटेकर यांचे निधन

**बांदा (प्रतिनिधी)**



पाडलोस - केणीवाडा येथील नीलेश लवू पटेकर (४१) यांचे रविवारी १८ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. पंचक्रोशीत उत्कृष्ट गोलंदाज म्हणून ते परिचित होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, भाऊ, भावजय असा परिवार आहे.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी



## बदलापूर घटनेचा मुरबाड तालुका शिवसेना पक्षाकडून निषेध

**मुरबाड :** मुरबाड विधानसभा मतदारसंघातील बदलापूर शहर येथील आदर्श विद्यामंदिर मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बदलापूर या शाळेतील सफाई कर्मचाऱ्याने चार वर्षीय दोन चिमूरड्यांवर केलेल्या लैंगिक अत्याचाराचा मुरबाड तालुका शिवसेना पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आलेला आहे.

या घटनेतील प्रमुख आरोपी अक्षय शिंदे याच्यावर कठोर कारवाई करून फाशीची शिक्षा द्यावी व या घटनेचे राजकारण न करता पिडीतांना न्याय द्यावा, या प्रमुख मागणीसाठी मुरबाड तालुका शिवसेना पक्षाच्या वतीने उपजिल्हाप्रमुख रामभाऊ दळवी, जिल्हा सचिव कांतीलाल कंटे, तालुकाप्रमुख प्रकाश पवार, तालुका महिला आघाडीच्या रेखा इसामे, युवासेना प्रमुख सागर कडव यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी संजय पवार, बळीराम आगिवले, तुकाराम घरत, सुनील घागस, जगन घुडे, जयवंत हरड, एकनाथ व्यापारी, जीवन शेळके, सुनील बांगर, महेश पवार, साईनाथ कदम, विलास राऊत, सोमनाथ आगिवले, संतोष मोरे, नरेश शिंदे, दर्शन शिंदे, दिनेश विशे, अजय मोहपे, रघुनाथ पारधी, नंदकुमार शिंदे, हनुमान चौधरी, गणेश शेलार, सागर मुरबाडे, मनोज आलम आदी उपस्थित होते.

# ठाण्यात प्रदूषण वाढल्याने दोन महिने अगोदरच फुलली सप्तपर्णींची फुले

## हवेत हरित वायूंचे प्रमाण वाढल्याचे संकेत

प्रशांत सिनकर

**ठाणे :** ठाणे शहरावर निसर्ग चांगलाच मेहेरबान असला तरी वाढत्या प्रदूषणावर निसर्ग कुरघोडी करत असल्याचे संकेत झाड देत आहे. ठाण्यात ठिकठिकाणी सप्तपर्णीची झाडे शहराची शोभा वाढवत असून, फुल फुलल्याने सुगंधाचा दरवळ सर्वत्र पसरलेला आहे. मात्र ऑक्टोबर महिन्यात फुलणारी फुले ऑगस्ट महिन्यातच फुलल्याने वातावरणात कार्बन डायऑक्साईडसारख्या हरित वायूंचे प्रमाण वाढले असल्याचे संकेत आहेत.



पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांची मोठी मदत मिळत आहे. त्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जात आहे. यामध्ये गुलमोहर, सुबाभूळ, रेन ट्रीसारख्या झाडांना प्राधान्य दिले जाते. ही झाडे पटापट वाढत असली तरी, पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी ही झाडे फारशी उपयोगाची नाहीत. परंतु झटपट वाढणाऱ्या झाडांमध्ये सप्तपर्णीचे झाड सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. जंगलात वाढणारे झाड आता ठाणे शहराच्या अनेक भागात आढळून येतात. या झाडाला हिवाळ्यात फुलांचा बहर असून संध्याकाळनंतर फुलांचा सुगंध पसरत असून एक वेगळा आनंद ठाणेकर घेताना दिसून येतात, मात्र हिवाळ्यात फुलणारी फुल ऑगस्ट महिन्यात फुलल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

रस्त्याच्या दुतर्फा ही झाडे मोठ्या प्रमाणात लावली जातात. फुलांच्या घमघमाटामुळे प्रत्येकाची नजर या झाडांकडे जात असून पानागणीत फुलांचे ताटवे झाडावर दिसून येतात. ४० ते ५० फुट उंचीची झाडे असून २५ ते ३० वर्षे जुनी झाडे आहेत. झाडाचा विस्तार गोलाकार असतो. प्रत्येक पेरावर येणारी चार ते सात संयुक्त पाने आणि प्रत्येक पानांत पाच ते सात पर्णे यामुळे हा वृक्ष सहज ओळखता येतो. पाने वरच्या बाजूने चकचकीत, खालच्या बाजूने राखाडी रंगाची असतात. फुले हिरवट, पांढरी झुबक्याने येतात. या वृक्षास फुले ऑक्टोबर, नोव्हेंबर या कालावधीत येत असल्याची माहिती ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. नागेश टेकाळे यांनी दिली.

> शहरात वाहनांची संख्या दिवसागणिक वाढत असून, यामुळे होणारे प्रदूषण पर्यावरणासाठी बाधक ठरत आहे. हवेत कार्बन डायऑक्साईड, मिथेन, नायट्रस ऑक्साईड, आदी हरित वायूंचे प्रमाण वाढल्याने सप्तपर्णीची फुल भर पावसात उमलली आहेत. एरवी थंडीच्या सुरुवातीला ही फुल फुलतात. मात्र प्रदूषण वाढल्यामुळे ही फुल लवकर फुलत असण्याची शक्यता आहे.
>
> **- डॉ. नागेश टेकाळे,**
> (ज्येष्ठ पर्यावरण, तज्ज्ञ)



### बदलापूर येथील 'रेल रोको'मध्ये राजकीय घुसखोरी

## 'निरपराध रेल्वे प्रवाशांवरील दंगलीचे गुन्हे मागे घ्या'

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

बदलापूरमध्ये घडलेली घटना मानवतेला काळिमा फासणारी आहे. अशा अपराध्यांना कडक शासन झालेच पाहिजे, या मागणीसाठी बदलापूर शहरात पालकांनी केलेले आंदोलन उत्स्फूर्त होते. पोलीस आणि शाळा प्रशासनाने दाखवलेली दिरंगाई पालकांच्या उद्रेकाचे मोठे कारण ठरली आणि न भूतो असे बदलापूर रेल्वे स्टेशनवर जमावाची गर्दी जमली, त्यातून उद्रेक झाला. घोषणाबाजी, दगडफेक, पोलिसांचा लाठीमार या घटनांनी वातावरण पेटले, रुळावरच जमावाने ठिय्या मांडल्याने संपूर्ण रेल्वे सेवा ठप्प झाली. आंदोलनाला पेटते ठेवण्याचे काम काही राजकीय घुसखोरांनी केली. मात्र याप्रकरणी निरपराध प्रवाशांची धरपकड पोलिसांनी केली असून, त्यांचे गुन्हे मागे घ्या अशी मागणी उपनगरीय रेल्वे प्रवासी एकता संस्थेने केली आहे.

बदलापूर घटनेनंतर आंदोलनकर्त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्यानंतरसुद्धा फलकबाजी करणारे कार्यकर्ते रेल्वे रूळ सोडायला तयार झाले नाहीत, परिणामी सर्वसामान्य प्रवाशांचा प्रचंड खोळंबा झाला. विद्यार्थी, महिला, रुग्ण आणि कामगार वर्ग अडकून बसले. हातावर पोट असणाऱ्या कामगारांना उपाशी पोटी घरी बसावे लागले. रेल्वे जीवन वाहिनी आहे आणि लाखो कुटुंब या जीवन वाहिनीवर अवलंबून आहेत. रेल्वेने प्रवास करणारे सर्व प्रवासी हे संवेदनशील आणि त्याहीपेक्षा जास्त संयमी आहेत. रेल्वे प्रशासनाच्या चुकीच्या आणि दिरंगाईच्या धोरणांवर प्रचंड नाराज असूनही प्रशासनाला लाखोली वाहत आपला प्रवास नित्यनेमाने करतात. कालच्या रेल्वे ठप्पमुळे अनेकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागले.

> बदलापूर रेल्वे आंदोलनात राजकीय अजेंडा घेऊन उतरलेल्या काही उपद्रवी कार्यकर्त्यांमुळे रेल्वेची प्रचंड नासधूस झाली. शिवाय मोठा आर्थिक तोटासुद्धा झाला. परंतु रेल्वे प्रशासनाने याचे सर्व खापर फलाटांवर उभे असणाऱ्या निरपराध रेल्वे प्रवाशांवर फोडले. अनेक प्रवाशांवर दंगल घडवणे, मालमत्तेच नुकसान असे गंभीर गुन्हे दाखल केले आहेत. प्रवासी संघटना कोणत्याही गुन्ह्याचे आणि दंगलीचे समर्थन करत नाही. परंतु दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करणाऱ्या सर्व सामान्य प्रवाशांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, ही प्रशासनाला विनंती आहे.
>
> **- नंदकुमार देशमुख,**
> अध्यक्ष : उपनगरीय रेल्वे प्रवासी एकता संस्था

## वेचक

### वाशीत आज 'जनसंवाद'चे आयोजन

**नवी मुंबई :** नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या वतीने गुरूवार, २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजता जनसंवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वाशी रेल्वे स्टेशननजिक सिडको ऑडिटोरियम, जोयाल्युकास ज्वेलर्ससमोर, सेक्टर - ३१ ए येथे हा जनसंवाद कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांच्या कर्तृत्व व अनुभवाचा सन्मान करताना त्यांना छत्री भेट देण्यात येणार आहे. भूमिपुत्रांच्या समस्या, शहरी आणि झोपडपट्टी धारकांचे मुलभूत हक्क जपणूक करणे, शहरातील शांतता, सुरक्षा आणि स्वच्छता अधिक सक्षम करणे याचा जनसंवादामध्ये आढावा घेण्यात येणार आहे. प्रभागातील प्रलंबित विकास कामे व विविध संघटनांचे निवेदन स्वीकारण्यात येतील. नवी मुंबई महापालिकेतील विरोधी पक्ष नेते दशरथ भगत हे या 'जनसंवाद'चे आयोजक असून या कार्यक्रमास ऐरोलीचे आमदार व ठाण्याचे माजी पालकमंत्री गणेश नाईक व माजी आमदार आणि भाजपाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला नवी मुंबईकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक दशरथ भगत यांनी केले आहे.

### मतिमंद विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा

**मुरबाड :** महाराष्ट्र राज्यातील सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय असलेली देवा ग्रुप संघटना विविध कार्यात सक्रिय योगदान देत असते. मुरबाड



तालुका अध्यक्ष चेतन मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त, जिल्हा परिषद शाळा कुंडाचीवाडी, विद्यानगर, डोंबेचिवाडी, सावळेवाडी, वाकळवाडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप करून व अवनी मतिमंद शाळा येथे मतिमंद विद्यार्थ्यांना जेवण व खाऊ वाटप करून वाढदिवस साजरा करत सामाजिक बांधिलकी जोपासली. देवा ग्रुप संघटना ही नेहमीच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर आहे. शैक्षणिक क्षेत्रात प्रत्येक विद्यार्थी हा पुढे गेला पाहिजे, हाच आमचा ध्यास आहे, असे देवा ग्रुप संघटनेचे मुरबाड तालुका अध्यक्ष चेतन मोरे यांनी यावेळी सांगितले.

### बदलापुरात इंटरनेट सेवा बंद

**ठाणे :** बदलापूरमधील चिमुकल्या दोन मुलींवर अत्याचार झाला. बदलापूरमधील नामांकित शाळेतील स्वच्छतागृहातील कर्मचाऱ्याने या दोन चिमुकल्या मुलींवर अत्याचार केला. ही घटना उघडकीस आल्यानंतर बदलापूरकर रस्त्यावर उतरले. रेल्वे ट्रॅकवर उतरत बदलापूरकरांनी ठिय्या आंदोलन केलं रास्ता रोको केला. त्यानंतर आता आज बदलापूरमध्ये तणावपूर्ण वातावरण आहे. बदलापूरमधील इंटरनेट पूर्णपणे बंद आहे. कालच्या आंदोलनानंतर बुधवारी बदलापूरमधील रेल्वे सेवा सुरळीतपणे सुरू आहे. पण काल झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. तर बदलापूरमध्ये कलम १६३ लागू करण्यात आले आहे. तर शहरातील दुकानेही आज बंद ठेवण्यात आली आहेत.

## रविवारी होणार 'वारी समतेची, वारी मानवतेची'

### कोर्टनाका सर्कलजवळ होणार अश्वरिंगण सोहळा

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे ओबीसी एकीकरण समिती आणि मराठा सेवा संघाच्या वतीने यंदाही वारी समतेची आणि वारी मानवतेच्या माध्यमातून यंदाही ठाणेकरांना समतेची वारी अनुभवता येणार आहे. येत्या रविवारी ठाण्यातील कोर्टनाका परिसरात होणाऱ्या या वारीत अश्वरिंगण सोहळा वारकऱ्यांचे आकर्षण ठरणार आहे.

या वारीचे आयोजक ठाणे ओबीसी एकीकरण समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल वाघोळे म्हणाले, काही कारणास्तव नागरिकांना आषाढी वारीत सहभागी होता येत नाही. त्यामुळे त्यांना वारी अनुभवता यावी म्हणून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर आणि संत तुकाराम महाराजांच्या शिकवणीवर या वारीचे आयोजन करण्यात आले.

या वारीच्या माध्यमातून समतामुलक विचारांचा जागर घालण्यात येणार आहे. या वारीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून होणार आहे.

या वारीच्या निमित्ताने संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज हभप भानुदास मोरे देहूकर यांचे किर्तन होणार आहे. या वारीत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, वारकरी संप्रदायातील संत, महात्मे यांची वेशभूषा केलेले कलावंत सहभागी होतील. त्यामुळे ठाणेकरांनी मोठ्या संख्येने या समतेच्या व मानवतेच्या वारीत सहभागी होऊन प्रत्यक्ष वारीचा अनुभव घ्यावा, असे आवाहन मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मंगेश आवळे यांनी केले आहे .

## घोडबंदर किल्ल्यावर सुरक्षा रक्षकांच्या नियुक्तीसह बसविले जाणार सीसीटीव्ही कॅमेरे

### किल्ला सुरक्षेसाठी आंदोलनाला बसलेल्या गडप्रेमींचा विजय



◆ **भाईंदर (वार्ताहर):**

असामाजिक लोकांकडून मद्यपानाच्या पार्ट्या, अंमली पदार्थांचे सेवन यामुळे किल्ल्याचे धोक्यात आलेले पावित्र्य यासाठी किल्ल्यावर सुरक्षा रक्षक तैनात करणे तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे या मागणीसाठी आंदोलनाला बसलेल्या गडप्रेमींचा विजय झाला आहे. त्यांच्या दोन्ही मागण्या महापालिका प्रशासनाने मान्य करून तसे पत्रक जाहीर केल्यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले.

मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात असलेला घोडबंदर किल्ला पुरातत्व विभागाने सुरक्षा आणि संवर्धनासाठी महापालिकाकडे सोपविला आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या किल्ल्यावर सुरक्षा देखभाल करण्यासाठी सुरक्षा रक्षक तैनात करणे तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक होते. परंतु प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे किल्ल्यावर असामाजिक लोकांचा वावर वाढून अंमली पदार्थ, मद्यपानाच्या बाटल्यांचा खच पडू लागला. त्यामुळे किल्ला जतन समितीच्या वतीने रोहित सुवर्णा आणि समिती सदस्यांनी महापालिका आयुक्त संजय काटकर यांची भेट घेऊन त्यांना किल्यावर सुरक्षा रक्षक नेमणे आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबतचे निवेदन दिले होते. परंतु आयुक्तांनी असमर्थता दर्शविली त्यामुळे गडप्रेमींनी सोमवारपासून भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात आंदोलन सुरू केले होते. त्याला सामाजिक संस्था, पत्रकार यांच्यासह भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसेसह सर्व राजकीय पक्षानी पाठिंबा दिला.

**मागण्या मान्य झाल्याने आंदोलन मागे :** शांततेत आणि कायद्याचे पालन करत सुरू असलेल्या गडप्रेमी आंदोलकांना पोलिसांनी नोटीस बजावली. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच आंदोलन स्थळावर स्नेहल कल्सरिया, संदिप राणे, नीता शिंदे यांच्यासह अनेक पत्रकारांनी सुध्दा धाव घेतली आणि पाठिंबा दर्शवित आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. अखेर महापालिका प्रशासनाने आंदोलनकर्त्यांच्या सुरक्षा रक्षक तैनात करणे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे या दोन्ही मागण्या मान्य केल्या आणि तसे पत्रक जाहीर केले. त्यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले.

## भाजपाच्या शहर उपाध्यक्ष गुलाब जगताप यांची निवड

◆ **कल्याण (वार्ताहर) :**



कचरा वेचून कुटूंबाची उपजीविका चालविणाऱ्या गुलाब जगतापची कल्याण शहर भाजपाच्या उपाध्यक्षपदी निवड केल्याचे नियुक्ती पत्र माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

गुलाब जगताप हे कल्याण पश्चिम भागातील साठेनगर झोपडपट्टीत कुटुंबासह राहून डंपिंगवर कचरा वेचण्याचे काम करतात. आईच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांनी हाच व्यवसाय निवडल्याचे ते सांगतात. माझी आई समाजकार्याचा एक भाग म्हणून शहरातील कचरा वेचून पोटाची खळगी भरत होती. लहान वयातच गुलाब जगताप यांनी आरएसएसचे ज्येष्ठ पदाधिकारी ललित सांरग, मधु फडके, माजी आमदार नरेंद्र पवार, अरुण देशपांडे, सुरेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक व राजकीय जीवनात सुरूवात केल्याचे त्यांनी सांगितले. कल्याण भाजपाचे शहर अध्यक्ष वरुण पाटील यांनी गुलाब जगताप यांचे तळागाळातील लोकांसाठीचे सामाजिक कार्य व पुढाकार पाहून त्यांची निवड केल्याचे सांगितले. त्यांना नियुक्ती पत्र देताना भाजपाचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी उपस्थित होते.



**तळवलीतील अनधिकृत इमारतींवर सिडकोचा हातोडा :** सिडकोच्या अतिक्रमण विभागाने बुधवारी केलेल्या कारवाईत नवी मुंबईतील तळवली येथील २ अनधिकृत इमारती जमीनदोस्त केल्या. ही कारवाई सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गर्शनाखाली करण्यात आली. गो.रा. खैरनार यांच्यानंतर सिडकोत मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी सिडकोच्या संपादित जमिनीवर उभ्या राहिलेल्या अनधिकृत इमारती विरोधात धडक कारवाई करून, सिडकोचे कोट्यवधी रुपयांचे भुखंड मोकळे केले आहेत. तळवली येथील सर्व्हे नंबर २७, २८, सेक्टर -२२ घणसोली येथे चार माळ्याची आरआरसी बांधकाम असलेली महेंद्र पाटील यांच्या मालकीची आणि विकासक सलील खान सर्व्हे नंबर २८ सेक्टर -२२ घणसोली मालक प्रकाश भिसे व विकासक संतोष परब यांचे सुरू असलेले इमारतीच्या तळ मजल्याच्या बांधकामावर कारवाई करण्यात आली.

## इन्शुरन्स न दिल्याने ठाण्यातील गोविंदा पथकांमध्ये संभ्रम

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

संपुर्ण देशभरात येत्या २७ ऑगस्टला दहिहंडी उत्सव साजरा होणार आहे. आठ दिवस शिल्लक असताना अजून गोविंदा पथकांचे इन्शुरन्स काढण्यात आले नाही. यासंदर्भात ठाण्यातील शासकिय विश्रामगृहात सर्व गोविंदा पथकांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद पार पडली. महाराष्ट्र शासनाने ७५,००० गोविंदाचा इन्शुरन्स जाहिर करण्यात आला आहे. गोविंदा पथकांना अद्यापही इन्शुरन्स मिळाले नसल्याची बाब मनसेचे पालघर ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या लक्षात येताच तातडीने ५००० गोविंदांचा इन्शुरन्स ठाणे जिल्हा दहिहंडी असोसिएशनच्या माध्यमातून काढण्यात येईल. गोविंदा पथकांनी अविनाश जाधव यांचे आभार मानले. शासनाच्या वतीने इन्शुरन्स जाहिर होतो, या इन्शुरन्सचा उपयोग बालगोपाळांना होतोय का ? सराव करताना बालगोपाळांना इजा होते. तेव्हा इन्शुरन्स मिळत नसल्याची खंत गोविंदांनी व्यक्त केली.



### आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या विकासकामांनी प्रभावित झाल्याचा दावा


## बेलापूर विधानसभेत असंख्य महिलांचे भाजपात 'इनकमिंग'

◆ **नवी मुंबई (वार्ताहर) :**

बेलापूर विधानसभा मतदारसंघातील भाजपा आमदार मंदा म्हात्रे यांच्या मार्फत बेलापूर विधानसभा मतदारसंघामध्ये होत असलेल्या विकास कामांनी प्रभावित होत बुधवारी वाशी येथील जनसंपर्क कार्यालयात सीबीडीतील विद्या देसाई, हसीना पंद्रिया, जसमीत तोमर, राजश्री बनसोडे, आशा यादव यांच्या समवेत असंख्य महिला भगिनींनी भाजपामध्ये पक्ष प्रवेश केला.

नारी शक्तीची ताकद बुधवारी आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईमध्ये दाखवली. गेल्या आठवड्यामध्ये बेलापूर विधानसभा मतदारसंघातील अनेक मुस्लीम भगिनींनी आमदार मंदा म्हात्रे यांच्या कार्याने प्रभावित होऊन देवीका करपे आणि रेखा गोदाम यांच्या माध्यमातून भाजपात प्रवेश केला. या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेचे विविध प्रकारच्या समस्या सोडविल्या जातात. तसेच सदर कार्यालयात विविध उपक्रमाचे आयोजन करून विविध योजनेच्या माध्यमातून नागरिकांना लाभ दिला जातो. या सर्व गोष्टींचा विचार करून बुधवारी असंख्य महिला भगिनींनी भाजपामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

या देशामध्ये / राज्यामध्ये विशेषतः नवी मुंबईमध्ये नव्हे तर, संपूर्ण महाराष्ट्रात महिलांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी गेल्या अनेक वर्षे आमदार मंदा म्हात्रे यांनी जे महत्त्वपूर्ण काम केले आहे ते वाखाण्याजोगे आहे व जेव्हा जेव्हा पक्षाने जबाबदारी दिली. त्या त्या वेळेस पदाला न्याय देण्याचे काम आमदार मंदा म्हात्रे यांनी केले असल्याचे प्रतिपादन विद्या सरदेसाई यांनी केले.



### विविध जाती-धर्मांचे पदाधिकारी भाजपात

यावेळी सर्व महिला आमदार मंदा म्हात्रे यांची ताकद दाखविण्यासाठी आम्ही एकत्र आलो असल्याचे प्रतिपादन विद्या देसाई व जसमीत तोमर यांनी केले आहे. नवी मुंबई शहरामध्ये आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीमधून व विविध योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या विविध विकासकामे मार्गी लागली असून त्यांचे लोकार्पणही झाले आहे व अजून महत्त्वाकांक्षी प्रकल्पही सुरु आहेत. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, आपल्या पक्षाची संघटना कशा पद्धतीने मजबूत होईल, या सर्वांचा विचार करून नवी मुंबईच्या मध्यभागी भाजपाचे जनसंपर्क कार्यालय उभारून विविध संघटना व विविध जाती धर्माचे पदाधिकारी कार्यकर्ते हे भाजपामध्ये पक्षप्रवेश करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

**महिलांची लक्षणीय उपस्थिती :** यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत मालती सोनी, वर्षा झरेकर, सुवर्णा चिकणे, लीला चव्हाण, रेखा गोदाम, देविका करपे, माधुरी सावंत, विद्या सावरकर, शीतल गांधी, सारिका पवार, विकास सोरटे, मुकुंद विश्वासराव, प्रताप भोसकर, महेश दरेकर, प्रवीण चिकणे, जेम्स आवारे तसेच महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## शहर सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी वरुण पाटील

◆ **कल्याण (वार्ताहर) :**



कल्याण शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची प्रमुख संस्था असलेल्या कल्याण शहर सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी भाजपा शहराध्यक्ष वरुण पाटील यांची नेमणूक करण्यात आली आहे. महामंडळाच्या बैठकीत वरुण पाटील यांच्याकडे ही अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली.

कल्याण शहर सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळ ही गेल्या ३५ वर्षांपासून कल्याण शहरात कार्यरत असून कल्याण शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये या महामंडळाला मानाचे स्थान आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेडसावणाऱ्या अडचणी, विविध मुद्द्यांसाठी शासन - प्रशासन स्तरावर करावा लागणारा पाठपुरावा आणि इतर महत्त्वाच्या विषयांवर गणेश मंडळांना लागणारे आवश्यक ते सहकार्य करण्याचे काम या कल्याण शहर सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाच्या माध्यमातून केले जाते. तर दरवर्षी कल्याणातील प्रतिष्ठीत व्यक्तींकडे या महामंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा सोपवली जाते. त्यानुसार यंदा २०२४-२५ साठी या महामंडळाच्या अध्यक्ष पदाचा मान कल्याण पश्चिमचे भाजपा शहराध्यक्ष वरुण पाटील यांना मिळाला आहे. आपल्याला ही संधी दिल्याबद्दल महामंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मनापासून आभार मानताना कल्याणातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेडसावणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया यावेळी अध्यक्ष वरुण पाटील यांनी दिली आहे.

या बैठकीला महामंडळाचे प्रदीप नातू, विजय कडव, अभिमन्यू गायकवाड, राजा सावंत, कांचन कुलकर्णी, राकेश मुथा, प्रतिक पेणकर, दया गायकवाड, जतिन प्रजापती, वैभव हरदास, सुधीर वायले, कुणाल गायकवाड, सागर भालेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# देशात आया-बहिणी सुरक्षित नाहीत

**रोहिदास जाधव** | **महिला अत्याचार विरोधात आंदोलन**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय), डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) आणि समविचारी पक्ष / संघटनांच्या वतीने वाढत्या महिला अत्याचाराच्या निषेधार्थ गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने आंदोलन करण्यात आले.




सविस्तर वृत्त असे की, महिला आणि मुलींवरील वाढत्या अत्याचाराचा तीव्र निषेध करण्यासाठी हे आंदोलन झाले. अत्याचाराच्या प्रकरणातील सर्व आरोपींना कडक शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात आली. कोलकातामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या महिला डॉक्टरवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. बदलापूरमध्ये एका शाळकरी बालिकेवर अत्याचार झाला. अकोल्यातून सुद्धा अशीच घटना समोर आली आहे. देशात आणि राज्यात महिलांवरील अत्याचार वाढतच चालले आहेत. म्हणून अशा घटनांना पायबंद करण्यासाठी कठोर उपाय करण्याची आवश्यकता आहे. स्वतंत्र भारतात महिलांना मोकळा श्वास घेता न येणे यापेक्षा मोठी नामुष्की काय असू शकते. देशात आया-बहिणी सुरक्षित नाहीत. देशातल्या अनेक भागात अशा घटना घडत आहेत. कोलकाता, बदलापूर, अकोला, पुणे, रायगड, बीड, कर्नाटक, उन्नाव, कठुआ, मणिपूर, बिहार अशा कितीतरी ठिकाणी अत्याचार झालेत. दर काही मिनिटाला महिला अत्याचाराची बातमी कानी येते. महिलांबद्दल अशी भयंकर परिस्थिती निर्माण झालेली असताना सरकार त्यावर बोलायला तयार नाही. कुठल्याही परिस्थितीत महिलांना सुरक्षितता देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. हे सरकारने विसरता कामा नये.बीडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून वाढत्या महिला अत्याचाराचा तीव्र निषेध करण्यात आला. यातून मागणी करण्यात आली की, महिला आणि मुलींवरील वाढते अत्याचार त्वरित रोखले पाहिजे. अत्याचाराच्या प्रकरणातील सर्व आरोपींना कठोरात कठोर कडक शिक्षा झाली पाहिजे. पीडितांना वेळेत न्याय मिळाला पाहिजे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत विद्यार्थिनींवरील अत्याचाराला रोखण्यासाठी 'जेन्डर सेन्सिटायझेशन कमिटी अगेन्स्ट सेक्सुअल हरासमेंट (जीएस-सीएएसएच ऋड-उ-डक)' ही समिती कार्यान्वित करावी.या आंदोलनात एसएफआयचे राज्य सचिव रोहिदास जाधव, डीवायएफआयचे जिल्हाध्यक्ष मोहन जाधव,प्रा. सुशिलाताई मोराळे, लहु खारगे, सत्यजित मस्के, संतोष जाधव, सुहास जायभाये, शिवा चव्हाण, कुंडलिक खेत्री, अक्षय वाघमारे, अभिषेक अडागळे, दत्ता सुरवसे, विजय लोखंडे, ज्ञानेश्वर शिंदे, दिया मते, साक्षी, सृष्टी ढास, कार्तिकी येवले संकल्प साठे, रवि जाधव, कृष्णा कोरडे, शैलेश आबूज, आदी सहभागी झाले होते.

# मांजरा धरणाच्या पाणी साठ्यात वाढ !

**दिलासा : परिक्षेत्रात पावसाचे प्रमाण वाढले**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



पाटोदा येथून उगम पावणारी मांजरा नदी ही दुधाडी भरून वाहत असल्याने धनेगाव (ता. केज) येथील मांजरा धरणाच्या जिवंत पाणी साठ्यात वाढ होत चालली आहे. पाटोद्याकडे झालेल्या मुसळधार पावसानंतर आता केज तालुक्यात आणि धरण क्षेत्रात सोमवारी रात्री झाल्याने धरणात पाण्याची आवक सुरू असून जिवंत पाणी साठा वाढला आहे. धनेगाव (ता. केज) येथील २२४.०९३ दलघमी साठवण क्षमता असलेले मांजरा धरण हे लातूर शहर, लातूर एमआयडीसी, अंबाजोगाई, केज, धारूर,कळंब शहरासह ६३ गावांची तहान भागवित असून ६१ गावांना सिंचनाचा लाभ मिळतो. मे महिन्यात धरणातील पाणी साठ्यात घट होऊन धरण हे मृत साठ्यात गेले होते. त्यात दोन महिन्यांचा पावसाचा कालावधी हा पडलेल्या पावसाच्या पाण्याने खोलवर गेलेली पाणी पातळी भरून येण्यास गेल्याने धरणाच्या पाणी साठ्यात अपेक्षित येण्यास गेल्याने धरणाच्या पाणी साठ्यात अपेक्षित वाढ झाली नव्हती. मात्र धरण क्षेत्रात पडलेल्या पावसाने व मांजरा नदीतून थोडेफार आलेल्या पाण्यावर धरण हे मृत साठ्यातून बाहेर पडले होते. त्यानंतर पाच दिवसांपूर्वी मांजरा नदीचा उगम असलेल्या पाटोदा या ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसाने मांजरा नदी दुधाडी भरून वाहू लागल्याने नदीचे पाणी हे धरणात दाखल झाल्याने दोन दिवसात ९ दलघमी इतका पाणी साठा वाढण्यास मदत मिळाली होती. तर सोमवारी केज तालुक्यात समाधानकारक आणि धरण क्षेत्रात ३५ मिमी इतका पाऊस पडल्याने मांजरा नदीतून पाण्याची आवक चांगली वाढली. त्यामुळे रात्रीतून ६ दलघमी इतका पाणी साठा वाढला आहे. आता धरणाच्या पाणी साठ्यात झपाट्याने वाढ होण्यास गती मिळाली आहे.

# कार्यकर्तृत्वाचा यथोचित सन्मान!

**अभिनंदनिय: वंजारी ढाकणे वंजारी समाजरत्न पुरस्कार**

नाशिक/पुण्यभूमी प्रतिनिधी

नाशिक येथील भव्य अशा कॅम्पस मध्ये दि १७ ऑगस्ट रोजी वंजारी समाज भुषण पुरस्कार सोहळा आयोजित केला होता या पुरस्कार सोहळ्यास मोठ्या प्रमाणामध्ये समाज बांधव व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.या मध्ये परळी तालुक्यातील पत्रकार, दै अतुल्य महाराष्ट्रचे संपादक नितीन ढाकणे यांना वंजारी समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले . या पुरस्कार सोहळ्यासाठी अध्यक्ष म्हणून सोपान महाराज सानप शास्त्री, उद्घाटक कोंडाजी मामा आव्हाड, तर प्रमुख पाहुणे म्हणून




महादेव जानकर (अध्यक्ष राष्ट्रीय समाज पक्ष) , बाळासाहेब सानप (संस्थापक अध्यक्ष भगवान महासंघ), तुळशीराम महाराज गुट्टे, आकाश खेडकर (अभिनेता), यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न संपन्न झालेल्या पुरस्कार सोहळ्यास मोठ्या प्रमाणामध्ये नाशिक व राज्यघटना समाज बांधव तसेच सर्व समाजातील प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले होते.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते गिरीश भाऊ पालवे, पंढरीनाथ थोरे, हरिभाऊ गीते (जलसंपदा अधिकारी), न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुनाताई यांची विशेष उपस्थिती यावेळी होती. क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण संस्था कॅनडा कॉर्नर शरणपूर रोड नाशिक येथील भव्य अशा कॅम्पस मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं.यावेळी पुढील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. यामध्ये ह.भ.प.राधाताई सानप बीडकर, राजेंद्र बुधाजी पानसरे (युवा उद्योजक नाशिक), बी आर चकोर (बांधकाम व्यावसायिक), डॉ संतोष सुदामराव सानप (वैद्यकीय), शंकरराव शेळके (समाज सेवक) पान २ वर...

# मागासवर्गीय वार्डात घाणीचे साम्राज्य

**आक्रमक : केज नगरपंचायत, कन्स्ट्रक्शनचा निषेध**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज नगरपंचायतची सत्ता जनविकास परिवर्तन आघाडी व कॉंग्रेस मिळुन स्थापन झालेली आहे . जनविकास परिवर्तन आघाडीचे हारुण इनामदार हे केज शहरामध्ये भाजपाचे काम मागील ०९ वर्षा पासून पाहतात . यावेळी लोकसभेला देखील निवडणुकीचे शहरातील कामकाज त्यांनीच पाहिले होते.मागील न.प केजच्या निवडणुकीत शहरातील वार्ड क्रमाक ७ मधुन कपिल मस्के तसेच विमल जोगदंड यांचा पराभव करून सौ. सिता बनसोड या मोठया मताधिक्याने निवडणून आल्या आणि नगराध्यक्ष पदावर विराजमान झाल्या. परंतु नगराध्यक्ष पदाचा प्रत्यक्षात




कारभार मात्र हारुन इनामदार हेच पाहत असल्याची चर्चा शहारातील जनेतेकडून ऐकावयास मिळत आहे. तसेच केज विधानसभेच्या भाजपाच्या आमदार सौ. नमिता मुंदडा या मागासवर्गीय समाजातून येतात तसेच नगराध्यक्षा सौ. सिता बनसोड या देखील मागासवर्गीय समाजाच्या आहेत मात्र मागासवर्गीय वार्डाचा तसेच केज शहरातील विकासासाठी त्या उदासिन असताना पहावयास मिळत आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे केज शहरात एकुण १७ वार्ड आहेत त्यापैकी वार्ड क्र. ७,९ व १६ मागासवर्गीय वार्ड म्हणून आरक्षीत आहेत. परंतु सदरील वार्डात घाणीचे साम्राज्य तसेच सत्ताधाऱ्यांची विकासासाठी उदासीनता दिसून येत आहे. त्यापैकी वार्ड क्र.१६ मध्ये नगरसेविका सौ. पल्लवी ओंमप्रकाश राजणकर या मोठया मताधिक्याने निवडणुन आल्या होत्या त्या निवडून आल्या मात्र त्यांना सत्ताधारी कसल्याच प्रकारे विश्वासात न घेता तथा मागासवर्गीय वस्तीत निधी न देता तसेच स्वच्छतेच्या संदर्भांने वार्डातील कामे सांगितले असता सत्ताधारी उदासिनता दाखवत असल्यामुळे वार्डात सर्वदूर दुर्गंधी , घाणीचे साम्राज्य परसले असल्याची प्रतिक्रिया दैनिक वादळ वार्ताच्या प्रतिनिधीशी बोलतांना त्यांनी दिली आहे. मात्र सदरील वार्ड क्र.१६ च्या समस्या डोके वरती काढत पान २ वर...

# आडोळा शिवारात वानरांचा धुमाकूळ

**मागणी : शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान**

गंगामसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील आडोळा, मोठेवाडी, रोषनपुरी गावासह शिवारात वानरांनी धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. शेतातील कामे सोडून वानराच्या मागेच फिरावे लागत आहे. शेतामध्ये असलेली पिके कापूस, सोयाबीन, मुग, फळबाग,भाजीपाला व इतर सर्व पिकांची नासधूस करीत आहेत. पिकांना आलेल्या मुगाच्या शेंगा, कापसाचे बोंड खाऊन सीताफळ बागेत नासधुस करून धिंगाणा करीत आहेत.परिसरात अशा अनेक टोळ्या आहेत. एका टोळीत पन्नास ते साठ वानरे आहेत. या वानरांनी गावात अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. गावाजवळील शेतातील पिकांसह घराच्या गच्चीवर वाळत घातलेले धान्य वानरे फस्त करत आहेत. ग्रामस्थ हुसकावण्यास गेल्यावर त्यांच्या अंगावर धावून येत आहेत. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या मागे लागत आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित वनविभागाने या वानरांचा बंदोबस्त करावा असी मागणी परिसरातील शेतकऱ्याच्या वतीने करण्यात आली आहे.



> वानर हे वन्यप्राण्यात येत नाही, त्यामुळे आम्ही त्यांचा बंदोबस्त करू शकत नाही. ज्या शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान झाले आहे. त्या शेतकऱ्यांनी तलाठी यांच्याकडे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून,ऑनलाईन अर्ज केल्यास शासनाकडून नुकसान भरपाई मिळते.
> -यु.एच.चिकटे, वनपरिक्षेत्र अधिकारी धारुर

# राज्य सरकार इतकेच शेतकरीही अलर्ट!

**योजना:शेतकऱ्यांनी पाठवले सरकारला आभाराचे मॅसेज**

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथे बुधवारी दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन संपन्न झालेल्या कृषी महोत्सवात नमो शेतकरी महासंन्मान योजनेचा प्रत्येकी दोन हजार रुपयांचा हप्ता एका क्लिकवर ९१ लाख शेतकऱ्यांना वितरित करण्यात आला. यावेळी राज्य सरकार जितके अलर्ट आहे तितकेच अलर्ट शेतकरी सुद्धा असल्याची अनुभूती आली आहे. झाले असे की, कृषी महोत्सवाच्या उद्घाटनाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या चौथ्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पैसे मिळाले का? असे विचारताच सभागृहात बसलेल्या



हजारो शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचे मेसेजेस त्यांच्या मोबाईलवर आले. त्याचबरोबर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या विनंतीवरून सोयाबीन कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी ई-पीक पाहणीची घातलेली अट मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात रद्द करत असल्याचे जाहीर केले. याचा दुहेरी आनंद झालेल्या शेकडो शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच कृषी मंत्री यांचे आभार मानणारे मेसेजेस धनंजय मुंडे यांच्या स्वीय सहाय्यकांकडे पाठवले व आपले मेसेज मान्यवरांपर्यंत पोहोचवण्याची विनंती केली.धनंजय मुंडे यांच्या स्वीय सहाय्यकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना शेतकऱ्यांनी पाठवलेले ते मेसेज दाखवले असता त्यांनी समोर बसलेल्या शेतकऱ्यांना हात उंचावून दाद दिली, त्याचबरोबर कार्यक्रम संपवून निरोप घेताना अनेक शेतकऱ्यांनी भेटून देखील मुख्यमंत्री व दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले.

# विकास करुन गावाची मान उंचावली!

**चर्चेले: सरपंच सुनिल देशमुखांचे काम उल्लेखनिय**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामपंचायतचे माजी सरपंच सुनील बापु देशमुख यांनी आपली सरपंच म्हणून काम करत असताना मागिल पाच वर्षांत वेगळी ओळख निर्माण केली आहे.तसेच चालू काळात सुध्दा चिंचोली माळीचे सरपंच रोहिणी सुनील देशमुख आहेत त्यामुळे माजी सरपंच सुनील बापु देशमुख यांनी राजकारणातुन समाजसेवक,गावचा विकास कसा करावा हे सांगणारे एकमेव व्यक्तीमत्व म्हणजे चिंचोली माळीचे माजी सरपंच सुनील बापु देशमुख आहेत.सुनील देशमुख यांनी ग्रामपंचायत अंतर्गत अनेक कोट्यवधी रुपयांचा विकास गावात केला जे मागिल काळातील सरपंच उपसरपंच यांना करता आले नाही असे कामे सुनील बापु देशमुख यांनी ग्रामपंचायत अंतर्गत करून दाखवले आहेत एवढा गावांमध्ये विकास करत असताना गावातील काड्या करणाऱ्या लोकांना मातीत घालून माजी सरपंच सुनील बापु देशमुख यांनी गावचा विकास करत गावची मान उंचावली आहे त्यामुळे येणाऱ्या काळात माजी सरपंच सुनील बापु देशमुख यांची ओळख चिंचोली माळीचे भावी जिल्हा परिषद सदस्य अशी ओळख माजी सरपंच सुनील बापु देशमुख यांनी निर्माण केलेली आहे अशा भावना नागरिकांन मधुन व्यक्त केल्या जात आहेत.

**भन्ते धम्मशील थेरो** | **धम्मभूमी शिवणीत श्रावण पौर्णिमा**

# धम्म ज्ञानाने अंधाररुपी अज्ञान नष्ट होते

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा हा वर्षा ऋतुतील तीन महिन्याचा काळ बुध्द धम्मामध्ये वर्षावास काळ म्हणून ओळखल्या जातो. तथागतांच्या जन्मापासून ते महापरिनिर्वाणापर्यंत अनेक महत्वाच्या अविस्मरणीय घटना पौर्णिमेच्याच दिवशी घडलेल्या आहेत. या सर्व घटनांचे महत्व व या प्रसंगातून मानवांना मिळणारे ज्ञान वर्षावास काळात पुज्य भिक्खु संघाच्या मधूर देसनेतून उपासक-उपासिकांना मिळत असते. मुख्य धम्मदेसनेत; 'प्रकाशाने अंधार नष्ट होतो, धम्मज्ञानाने अंधाररुपी अज्ञान नष्ट होते' असे प्रतिपादन श्रावण पौर्णिमेच्या धम्मदेसनेत पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले.



प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था यांनी महाविहार धम्मभूमी डॉ.भदंन्त आनंद कौशल्यायन नगर मौजे शिवणी ता.जि.बीड येथे आयोजित केलेल्या श्रावण पौर्णिमा निमित्त धम्मदेसना व सत्कार समारंभ आयोजित केला होता. या प्रसंगी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. उत्तमराव साळवे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.प्रदीप रोडे सर यांनी केले. सर्वप्रथम ऐतिहासिक बोधीवृक्षाची पूजा, धम्महॉल येथे पूज्य भन्तेजींच्या हस्ते तथागतांच्या प्रतिमेस पुष्प व दीपाने पूजन करुन व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्रमुख अतिथींच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन त्रिवार वंदन करण्यात आले. पूज्य भन्तेजींनी उपस्थितांना त्रिसरण-पंचशील दिले. या प्रसंगी उपविभागीय अधिकारी माजलगाव गौरव इंगोले, छत्रपती संभाजीनगरचे सहसंचालक तंत्रशिक्षण विभागाचे उमेश नागदीवे, से.नि.दुय्यम निबंधक हिरामन उजगरे, पिपल्स महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य साहेबराव इंगोले यांची प्रमुख अतिथी लाभले होते. तर सत्कारमूर्ती से.नि. पोलिस उपनिरीक्षक आयु.कल्याणराव भंडारे, ग्रा.पाणी पुरवठा विभागाच्या कनिष्ठ अभियंता आयु.मंगलाताई सोनवणे यांची उपस्थिती होती. धम्म आचरणाने माणसाच्या अंगी नम्रता, करुणा, मैत्री व कुशलकर्म करण्याची भावना निर्माण होते. आपल्या सरकारी, निमसरकारी सेवेत आपले अधिकार बजावतांना समाजोपयोगी कार्य करणार्यांचा गौरव करणे हे आपले कर्तव्य हे ओळखून पोलीस खात्यात ३५ वर्षे केवळ आणि केवळ पान २ वर...

# राष्ट्रीय क्रांती सेना संघर्ष करणार

**परमेश्वर मुंडे: कोणत्याही पक्षाच्या उमेदवाराला पाठींबा नाही**

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदार संघ हा माजलगाव धरनामुळे सुजलाम - सुफलाम बनलेला आहे हा सधन तालुका आहे मात्र या भागात बेरोजगारी पण मोठ्या प्रमाणावर दिसते त्या साठी या भागात मोठमोठे उद्योग उभारून या वर मात केली जाऊ शकते तसेच या भागातील ऊस कारखानदार शेतकर्याच्या ऊसाला भाव कमी देणे ऊसाचे बिले वेळेवर न देणे मापात काटा मारने तसेच या कारखान्यान मध्ये ओबीसी मुस्लीम दलीत या शेतक्ररायचे शेरष नाहित ते त्याना देण्यात यावे या कारखानदारानी कारखाने मात्रा सहकारी काढले शेरष धारक व नोकरीला मात्र आपले नातेवाईक सगेसोरे बगलबच्चे लावले त्या साठी राष्टीय क्रांती सेनेने



आदोलनाचे पाऊल उचलले असून लवकरच मोठे आंदोलन उभारणार आल्याचे राष्टीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष मा .परमेश्वर मुंडे यांनी दि .२० मंगळवार रोजी माजलगाव येथील पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले .

माजलगाव विधान सभा मतदार संघाने अनेकांना मोठे केलं येथील राजकारण्यांनी आपलीच प्रगती गेली गरीबाकडे दुर्लक्ष केलं या मुळे या भागातील सुशिक्षित तरुण बेकरीत राहिला शेहरात जाऊन वीस हजार प्रति महिना नैकरी करून त्याचा प्रपंच चालू शकत नाही म्हणून त्याला आपल्याच भागात काम मिळाले तर तो चांगला राहू शकतो . या साठी या भागात मुबलक पाणी असल्याने मोठी औद्योगिक वसाहत करून येथे मोठे उद्योग उभारणे श्यक्य आहे या मुळे या भागातील सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम मिळेल या साठी राष्टीय क्रांती सेना संघर्ष करणार असल्याचे सांगितले .

त्याच बरोबर या भागात सर्व आजार मोफत पान २ वर...